POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०४ ● अंक-२१० ● मुंबई, रविवार, २ मार्च २०२५ ● पृष्ठ-४ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## केंद्रीय मंत्रिमंडळाने नवीन शैक्षणिक धोरणाला मंजुरी दिली

## १०वी बोर्ड रद्द, एमफिल देखील बंद होईल

**■मुंबई। प्रतिनिधी :**

आज केंद्रीय मंत्रिमंडळाने शिक्षण मंत्रालय, भारत सरकार द्वारा प्रस्तावित नवीन शैक्षणिक धोरण २०२० ला मंजुरी दिली. ३६ वर्षांनंतर, केंद्र सरकारच्या कॅबिनेटच्या मान्यतेनंतर देशात नवीन शैक्षणिक धोरण लागू करण्यात आले आहे.

केंद्रीय मंत्रिमंडळाने नवीन शैक्षणिक धोरण २०२० ला हिरवा झेंडा दिला आहे. ३४ वर्षांनी शैक्षणिक धोरणात बदल करण्यात आले आहेत. नवीन शैक्षणिक धोरणाची प्रमुख वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेतः



**शिक्षण संरचना (५+३+३+४ फॉर्म्युला)**

- ५ वर्ष - मूलभूत (फाऊंडेशनल) शिक्षण

२.नर्सरी @ ४ वर्ष
२.जूनियर केजी @ ५ वर्ष
३.सीनियर केजी @ ६ वर्ष
४.इ. १ @ ७ वर्ष
५.इ. २ @ ८ वर्ष

- ३ वर्ष - प्रारंभिक (प्रिपरेटरी) शिक्षण

६.इ. ३ @ ९ वर्ष
७.इ. ४ @ १० वर्ष
८.इ. ५ @ ११ वर्ष

- ३ वर्ष - माध्यमिक (मिडल) शिक्षण

९.इ. ६ @ १२ वर्ष
१०.इ. ७ @ १३ वर्ष
११.इ. ८ @ १४ वर्ष

- ४ वर्ष - उच्च माध्यमिक (सेकंडरी) शिक्षण

१२.इ. ९ @ १५ वर्ष
१३.इ. १० (SSC) @ १६ वर्ष
१४.इ. ११ (FYJC) @ १७ वर्ष
१५.इ. १२ (SYJC) @ १८ वर्ष

**विशेष वैशिष्ट्ये:**

- आता केवळ १२ वी मध्ये बोर्ड परीक्षा होईल.
- १० वी बोर्ड परीक्षा अनिवार्य होणार नाही.
- एमफिल (MPhil) समाप्त केला जाईल.
- कॉलेज डिग्री ४ वर्षांची असेल.
- आता ५ वी पर्यंत शिक्षण मातृभाषा, स्थानिक भाषा आणि राष्ट्रीय भाषेमध्ये होईल. इंग्रजी केवळ एक विषय म्हणून शिकवले जाईल.
- ९ वी ते १२ वी पर्यंत सेमेस्टर पद्धती लागू केली जाईल.
- कॉलेज डिग्री आता ३ किंवा ४ वर्षांची असेल.
  १ वर्षानंतर प्रमाणपत्र
  २ वर्षानंतर डिप्लोमा
  ३ वर्षानंतर डिग्री
  ४ वर्षांची डिग्री करणारे विद्यार्थी थेट १ वर्षात MA करू शकतील.
- MA करणारे विद्यार्थी आता थेट PhD करू शकतील.
- जर कोणत्याही विद्यार्थ्याला एखाद्या कोर्सच्या मध्यावर दुसरा कोर्स करायचा असेल, तर त्याला काही काळ ब्रेक घेऊन ते करण्याची परवानगी असेल.
- उच्च शिक्षणातील प्रवेश दर (GER) २०३५ पर्यंत ५०% करण्याचे लक्ष.
- उच्च शिक्षणामध्ये अनेक सुधारणा केली जातील, ज्यामध्ये शैक्षणिक, प्रशासनिक आणि वित्तीय स्वायत्तता समाविष्ट असेल.
- ई-कोर्स प्रादेशिक भाषांमध्ये सुरू केले जातील.
- वर्च्युअल लॅब्स विकसित केली जातील.
- राष्ट्रीय शैक्षणिक तंत्रज्ञान मंच (NETF) ची स्थापना केली जाईल.
- देशभरातील सरकारी, खासगी आणि डिम्ड संस्थांसाठी समान नियम लागू केले जातील.

## अजित पवार जे बोलले ते महिनाभरात प्रत्यक्षात खरं करुन दाखवलं

**■पुणे। प्रतिनिधी :**

उपमुख्यमंत्री अजित पवार पालकमंत्री असलेल्या पुणे आणि बीड या दोन्ही जिल्ह्यांमध्ये दोन नवीन पशुवैद्यकीय महाविद्यालये स्थापन करण्यास राज्य मंत्रिमंडळाने आज मान्यता दिली. मागील जानेवारी महिन्यात बारामती येथे आयोजित 'कृषिक-२०२५' प्रदर्शनात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुण्यात बारामती आणि बीड जिल्ह्यात परळी येथे नवीन कृषी महाविद्यालय स्थापन करण्याची घोषणा केली होती. त्यानंतर महिन्याभरातच सर्व प्रक्रिया पूर्ण होऊन त्या प्रस्तावांना आज मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. यामुळे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे प्रशासकीय कौशल्य आणि कामाचा झपाटा पुन्हा एकदा अनुभवायला मिळाला.

महाराष्ट्र शेतीप्रधान राज्य असून शेतीच्या बरोबरीने पशुधनाचा विकासही महत्वाचा आहे. आज मंजुरी मिळालेल्या बारामती आणि परळी येथे नवीन शासकीय पशुवैद्यकीय महाविद्यालयांमुळे पशुपालकांना अत्याधुनिक, दजेदार पशुवैद्यकीय सेवा मिळणार असून, राज्यात प्रशिक्षित पशुवैद्यकांची संख्या वाढण्यास मदत होणार आहे. राज्यातील पशुधनाच्या आरोग्याची काळजी आणि विकासासाठी ही पशुवैद्यकीय महाविद्यालये महत्वाची भूमिका बजावतील, असा विश्वास यानिमित्ताने व्यक्त करण्यात येत आहे.

बारामती येथे जानेवारी २०२५ महिन्यात आयोजित 'कृषिक-२०२५' कृषी प्रदर्शनात, शेतकरी आणि पशुपालकांनी बारामतीमध्ये पशुवैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याची मागणी केली होती. या मागणीला तातडीने प्रतिसाद देत ही महाविद्यालये स्थापन करण्यात येतील, अशी घोषणा अजितदादांनी सभेत केली होती. त्यानंतर महिन्यातच अजितदादांनी मंत्रिमंडळाची मंजुरी मिळवून दिली. बारामतीतील कऱ्हावागज येथे ८२ एकर आणि परळीच्या लोणी येथे ७५ एकर जागेवर ही शासकीय महाविद्यालये उभारली जाणार आहेत.



उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राज्याची अर्थव्यवस्था एक ट्रिलियन डॉलरवर नेण्याचे ध्येय ठेवले आहे. यासाठी शेती आणि शेतीपुरक व्यवसायांना चालना देण्याची गरज ओळखून, पशुपालन आणि दुग्ध व्यवसायाला प्रोत्साहन देण्याचा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. सध्या राज्यात पशुवैद्यकीय सेवा आणि पशुवैद्यकांची मोठ्या प्रमाणावर गरज असून, नवीन महाविद्यालयांमुळे प्रशिक्षित पशुवैद्यकांची संख्या वाढेल आणि राज्यभर पशुसंवर्धन सेवा अधिक भक्कम होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

राज्याचे उपमुख्यमंत्री, अर्थमंत्री तसेच पुणे आणि बीड जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदाची जबाबदारी सांभाळणारे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी महिन्याभराच्या अतिशय कमी वेळात हा लोकोपयोगी निर्णय मंजूर करून घेतला. त्यामुळे त्यांच्या नेतृत्वाखालील पुणे व बीड जिल्ह्यासह राज्याच्या विकासाला चालना मिळणार आहे.

**प्रत्येकी २३४ नियमित, ४२ मानधनावरील पदांना मान्यता**

या शासकीय पशुवैद्यकीय महाविद्यालयांसाठी मोठ्या प्रमाणात पदनिर्मिती करण्यात आली आहे. प्रत्येक महाविद्यालयासाठी शिक्षक संवर्गात ९६, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसाठी १३८ नियमित पदे मंजूर करण्यात आली आहेत. त्याशिवाय, बाह्यस्त्रोतांद्वारे प्रत्येकी ४२ पदे मानधन तत्त्वावर भरण्यासही मान्यता देण्यात आली आहे.

**महाविद्यालयांसाठी ११२९ कोटींची आर्थिक तरतूद**

बारामती आणि परळी येथील महाविद्यालयांसाठी एकूण ११२९.१६ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. प्रत्येक महाविद्यालयासाठी ५६४.५८ कोटी रुपये खर्च होणार असून, या निधीतून प्रगत संशोधन केंद्रे, अत्याधुनिक प्रयोगशाळा आणि आधुनिक सुविधा उभारल्या जातील.

**पशुपालकांचा आनंद, राज्य सरकारच्या निर्णयाचे स्वागत**

या निर्णयामुळे राज्यातील पशुपालकांना मोठा दिलासा मिळणार असून, अत्याधुनिक पशुवैद्यकीय सुविधा अधिक सुलभ होतील. विशेषतः बारामती आणि परळी परिसरातील शेतकरी व पशुपालकांनी सरकारच्या या निर्णयाचे स्वागत केले आहे. हा निर्णय कृषिपूरक व्यवसायांना चालना देईल आणि राज्यातील पशुधन संगोपनासाठी नव्या संशोधन आणि तंत्रज्ञानाचा मार्ग मोकळा करेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## अजित पवारांच्या पदाधिकाऱ्याने जन्मदात्या आईलाचा केली मारहाण

## महिलेने कथन केली आपबिती



**■मुंबई। प्रतिनिधी :**

त्री अजित पवार यांच्या पक्षातील पदाधिकाऱ्याने त्याच्याच जन्मदात्री आईला अमानुषपणे बेदम मारहाण केली आहे. पदाधिकाऱ्याने हा आरोप फेटाळला असला तरी त्याच्या आईने मात्र समोर येऊन आपबिती कथन करत मुलाचं पितळ उघडं पाडलं आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मावळ तालुका राष्ट्रवादी ओबीसी सेलचे अध्यक्ष मारुती देशमुख याच्यावर आईला मारहाण केल्याचा आरोप आहे. मारुती देशमुख यांनी आईला बेदम मारहणा केल्याने त्या महिल्चेया पाठीवर, हातावर तसेच मानेवरही मारहाणीचे व्रण उठले आहेत.

मारुती देशमुख यांची नुकतीच मावळ राष्ट्रवादी काँग्रेस ओबीसी सेलच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. कार्ला येथील आई एकविरा देवी ट्रस्टचं विश्वस्त पद ही त्यांच्याकडे असल्याचे समजते. दोन दिवसांपूर्वी त्यांनी आईला मारहाण केली होती असा आरोप आहे. मात्र आपण आईला मारल्याचा खोटा बनाव रचत माज्या लहाने भावाने, राजेंद्र देशमुखने गुन्हा दाखल केला, पण आपण मारहाण केली नाही असा दावा मारुती देशमुखनी केला आहे. मला अजित दादांनी पद दिलं म्हणून मला बदनाम करण्याचा हा डाव आहे. उलट आमदार सुनील शेळकेंचा माज्यावर विश्वास आहे. असा खुलासा मारुती देशमुखांनी केला. पण मुलाचे हे वक्तव्य ऐकल्यावर ती माऊली स्वतःपुढे आली आणि मुलाचे पितळ उघडे पाडत सर्व आपबिती कथन केली.



**जन्मदात्या आईलाच मुलाकडून मारहाण**

देशमुख यांची आई सात-आठ महिन्यांपूर्वी मारुती आणि दुसरा मुलगा विलास देशमुखांकडे राहायला आल्या, त्याआधी त्या पुण्यात राहणारा लहान मुलगा राजेंद्र देशमुख यांच्याकडे राहत होत्या. मात्र, आता मूळगावी देवघर या ठिकाणी जायचा हट्ट धरला आणि त्या तिथं राहायला आल्या. मात्र, आपली आई घरी राहायला आली हे मारुती देशमुख आणि कुटुंबियांना आवडलं नाही, रुचलंही नाही. मग आपली आई ही पुण्यात लहान भावाकडे परत जावी, म्हणून तिचा मानसिक आणि शारीरिक छळ केला, असा आरोप लहान मुलगा राजेंद्र यांनी केला आहे. यातूनच दोन दिवसांपूर्वी मारुती देशमुखांनी आईला बेदम मारहाण केली. मात्र मारुती यांनी हे आरोप फेटाळले. पण त्यानंतर त्या महिलेने पुढे येत सर्व कहाणी कथन केली. पोटच्या मुलाची अब्रू वाचवण्यासाठी मी मूळगावी आले पण मुलाने मात्र माझा मानसिक आणि शारीरिक छळ केला. जन्मदात्या आईने पोटच्या मारूत देशमुखांवर असा आरोप केला. कार्ला येथील आई एकविरा देवी ट्रस्टचे उपाध्यक्ष पद ही मारुती देशमुखांकडे आहे. मात्र स्वतःच्या आईवर ते अन्याय करत असल्यानं चहुबाजूंनी त्यांच्यावर टीकेची झोड उठत आहे. खरं तर अजित पवार अशा समर्थकांना खपवून घेत नाहीत, ते जाहीरपणे असं बोलून ही दाखवतात. मात्र प्रत्यक्षात अजित दादा तशी कृती करताना काय दिसत नाहीत. म्हणूनचं मारुती देशमुखांवर अजित दादांनी कारवाई करण्याची मागणी बंधू राजेंद्र देशमुखांनी केलाय. त्यामुळं आता अजित पवार कठोर पावलं उचलत मारुती देशमुखांची पक्षातून हकालपट्टी करतात का? याकडे सर्वांचं लक्ष लागून आहे.

## महाराष्ट्रात नेमकं चाललंय काय?

### कुठे हत्या, तर कुठे बापाकडूनच मुलींवर अत्याचार, तर कुठे प्राणघातक हल्ला...



**■पुणे। प्रतिनिधी :**

पुण्यातील स्वारगेट बस स्थानकावर एका २६ वर्षीय तरुणीवर अत्याचार झाला. दत्तात्रय गाडे असे या आरोपीचे नाव आहे. बस स्थानकावर घडलेल्या या प्रकरणानंतर आरोपी अजूनही पोलिसांना सापडला नाही. सकाळी ५.३० वाजता ही घटना घडली.

या घटनेनंतर कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यानंतर आता मुंबईजवळ असलेल्या वसई, विरार आणि नालासोपाऱ्यात अनेक धक्कादायक घटना समोर आल्या आहेत.

**प्रियकराकडून प्रेयसीवर धारदार हत्याराने वार**

विरारमध्ये प्रेम प्रकरणातून प्रियकराने प्रेयसीवर धारदार हत्याराने वार केल्याची धक्कादायक घटना उघड झाली आहे. या प्राणघातक हल्ल्यात तरुणी गंभीर जखमी झाली आहे. तिच्यावर खाजगी रुग्णालयात अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. ही तरुणी मेडिकल स्टोअरमध्ये फार्मासिस्ट म्हणून काम करत होती. बुधवारी २६ फेब्रुवारी रोजी दुपारी ३.३० च्या सुमारास ही घटना घडली आहे. या हल्ल्यात मुलीच्या हातावर आणि मनगटावर चाकूने वार करण्यात आले. तसेच रागाच्या भरात मारलेल्या लाथेमुळे त्या तरुणीचा जबडा फॅक्चर झाला आहे. भाविका भालचंद्र गावड असे असे प्राणघातक हल्ल्यात जखमी झालेल्या तरुणीचे नाव आहे. तर अक्षय जनार्धन पाटील असे हल्ला करणाऱ्या आरोपीचे नाव आहे. ही तरुणी विरारच्या रामभजन मेडिकल स्टोअर्समध्ये फार्मासिस्ट म्हणून गेल्या ४ महिन्यापासून काम करीत होती. तिचे विरार पूर्वेच्या गास कोपरी गावात राहणारा तरुण अक्षय जनार्दन पाटील याचे गावात राहणाऱ्या २३ वर्षीय भाविका भालचंद्र गावडसोबत 11 वषार्पासून प्रेमसंबंध होते. अक्षय आणि भाविकाचे या डिसेंबरमध्ये लग्न ही ठरलं होतं. मात्र भाविका दुस-या मुलाशी व्हॉटसअपवर बोलत असते, या रागातून आणि संशयातून अक्षयने हे कृत्य केल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे

**विरारमध्ये तिहेरी हत्याकांड**

तसेच विरारमध्ये तिहेरी हत्याकांड झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. विरार पश्चिम या ठिकाणी राहणाऱ्या एका इसमाने आपल्या पत्नीसह ५ वर्षीय चिमुकलीचा गळा आवळून खून करून स्वतः आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. आर्थिक विवंचनेतून त्याने हे कृत्य केलं असावं, असा प्राथमिक अंदाज पोलिसांनी वर्तवला आहे. उदयकुमार काजवा ५२, वीणा उदयकुमार काजवा ४२, शिवालिका उदयकुमार ५ अशी त्यांची नावे आहेत.

विरारच्या ग्लोबल सिटी येथे ते भाड्याने राहत होते. वीणाचा पहिल्या पतीचा मुलगा वेदांत हा शाळेत गेला होता. मुलगा काल शाळेतून आल्यावर त्याने आई वडिलांना खूप कॉल केले. पण त्यांनी एकही फोन कॉल उचलला नाही. त्यामुळे त्या मुलाला वाटले की आई वडील मला एकट्याला सोडून निघून गेले. मात्र सोसायटीमध्ये मुलाने सुरक्षा रक्षकांना सांगितल्यानंतर सुरक्षारक्षकाने दरवाजा ठोठावला. मात्र आतून कोणताही प्रतिसाद आला नाही. मग त्यांनी खात्री करण्यासाठी चावी बनवणाऱ्या चावी वाल्याला बोलावून दरवाजा उघडला. पण आतून साखळी लावली होती. ही साखळी उघडल्यावर आतमध्ये उदयकुमार याने गळफास घेतल्याचे दिसले. त्यासोबतच खाली दोघांचे मृतदेह असल्याचे दिसले. त्यामुळे घाबरलेल्या सुरक्षारक्षकांनी तात्काळ पोलिसांना फोन करून माहिती दिली. पोलिसांनी आल्यानंतर सदर घटनास्थळाचा पंचनामा करत मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला आहेत. आर्थिक विवंचनेतून ही आत्महत्या झाल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी वर्तवला आहे.

**नालासोपाऱ्यात बापाकडून ३ सख्ख्या मुलींवर लैंगिक अत्याचार**

तर दुसरीकडे नालासोपाऱ्यात बाप-मुलीच्या पवित्र नात्याला काळिमा फासणारी घटना घडली आहे. जगातील सर्वात श्रेष्ठ असे बाप आणि मुलीचे पवित्र नाते आहे. मुलीवर कितीही मोठे संकट आले तर तिने बापाच्या खांद्यावर मान टाकली की तिचे सर्व दुःख नाहीसे होतात. पण याच पवित्र नात्याला नालासोपाऱ्यात काळिमा फासली आहे. सख्या बापाने ३ सख्ख्या मुलींवर लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना उघड झाली आहे. या मुलींनी नालासोपारा पोलीस ठाण्यात तक्रार दिल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला आहे. आरोपी वासनांध विकृत बाप हा कुख्यात गुन्हेगारी पार्श्वभूमीचा आहे. त्याच्यावर खंडणी, गोळीबार, हत्या, सुपारी घेऊन हत्या, दरोडा, चोरी असे गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. 2017 पासून हा विकृत वासनांध बापाने आपल्याच मुली, पत्नी यांना दहशतीखाली ठेवून पोटाच्या तीन मुलीवर अत्याचार केले आहेत. या विकृताला 5 मुली, पत्नी आणि एक मुलगा आहे. आईला ही घटना माहीत झाल्यानंतर तिला ही गंभीरपणे मारहाण केली आहे.

शेवटी अशा विकृत व्यक्तींच्या तावडीतून सुटण्यासाठी आईने आपल्या मुलींना घेऊन विरार नालासोपारा गाठले. सर्व घटना नातेवाईकाला सांगितल्यावर काल नालासोपारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून त्याला अटक केले आहे. या अत्याचाराला तसेच हत्येसारख्या गंभीर गुन्ह्यातील आरोपी आहे. बुधवारी नालासोपारा पोलिसांनी मुलींचे जबाब नोंदवून गुन्हा दाखल केला. तसेच आरोपी पित्याला अटक केली.

**लग्नाचा तगादा लावल्याने हत्या**

उत्तरप्रदेशातील बेपत्ता मुलीच्या हत्येचा दोन महिन्यानंतर शोध लावण्यात विरार क्राईम ब्रँच युनिट तीनच्या पथकाला यश आले आहे. प्रिया शंभुनाथ सिंग (वय २५) असे हत्या तरुणीचे नाव आहे. तर अमित सिंग (वय २८ ) असे आरोपीचे नाव आहे. प्रिया ही उत्तरप्रदेशातील गोरखपूर जिल्ह्यातील राहणारी आहे. तर आरोपी हा वसईतील राहणारा आहे. या दोघांचे मागच्या अनेक दिवसांपासून प्रेमसंबंध जुळलेले होते. हे दोघेही लग्न करणार होते, मात्र मुलाच्या घरच्यांचा विरोध असल्याने आरोपी हा लग्नाला टाळाटाळ करीत होता. मुलगी लग्नाचा तगादा लावत असल्याने प्रियकर तरुणाने तिला २५ डिसेंबरला वसईत बोलावून, फिरायला नेण्याच्या बहाणा केला. तो तिला वसईच्या पोमन महाजन पाडा या ठिकाणी घेऊन गेला आणि तिची निर्घृणपणे हत्या केली. यानंतर दृश्यम सिनेमातील सिने स्टाईलने ती दिल्लीला गेली असे भासवण्यासाठी तिचा मोबाईल राजधानी एक्स्प्रेसमध्ये ठेवून आरोपी फरार झाला होता. उत्तरप्रदेशातील गोरखपूर जिल्ह्यातील एम्स पोलीस ठाण्यात या मुलीची मिसिंग दाखल होती. याचा तपास करण्यासाठी यूपी पोलीस मीरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयच्या गुन्हे शाखेत आले होते. त्यांनी या सर्व प्रकरणाचे गांभीर्य ओळखून अवघ्या २४ तासात विरार क्राईम बरंच युनिट तीनच्या पथकाने आरोपीचा शोध घेऊन गुन्ह्याचा उलगडा केला.

## 'एक रुपयात ३९९९ रुपयांचा रिचार्ज' अशी ऑफर, बॅलेन्स भरताच तरुण कर्जाच्या जाळ्यात, महाराष्ट्रात नावी ॲपचा मोठा घोटाळा!

**■वर्धा। प्रतिनिधी :**

महाराष्ट्रात 'नावी इन्स्टंट लोन ॲप'च्या माध्यमातून मोठ्या आर्थिक घोटाळ्याचा पदार्फाश झाला असून या फसवणुकीचं केंद्रबिंदू धाराशिव जिल्ह्यातील ढोकी गाव ठरलं आहे. मोबाईल रिचार्जच्या आकर्षक ऑफरच्या नावाखाली या ॲपकडून तरुणांवर कजार्चा फास बसल्याचं उघडकीस आल्याने मोठी खळबळ उडाली आहे. ढोकी गावातील तब्बल २००-३०० तरुण या ऑफरच्या जाळ्यात आले आहेत. साधारण दोन ते तीन कोटींचा घोटाळा असल्याचा अंदाज या घोटाळ्यात व्यक्त करण्यात येतोय.







रिचार्ज ऑफरच्या नावाने आर्थिक फसवणूक झाली असून धाराशिव जिल्ह्यातील ढोकीचे २००-३०० तरुण या फसवणूकीत अडकले आहेत.नावी ॲपने एक खास ऑफर आणली होती, जिच्या अंतर्गत केवळ १ रुपयात ३९९९ रुपयांचा मोबाईल रिचार्ज दिला जात होता. ही ऑफर ख्रिसमसच्या मुहूर्तावर मोठ्या प्रमाणावर प्रसिद्ध करण्यात आली होती. या ऑफरचा फायदा घेण्यासाठी तरुणांनी युपीआयच्या माध्यमातून पेमेंट केले. मात्र, काही दिवसांतच त्यांच्या बँक खात्यांवर मोठी रक्कम उचलण्यात आल्याचे समोर आले. ढोकी गावातील २०० ते ३०० तरुण या फसवणुकीचे बळी ठरले आहेत. किराणा दुकानात काम करणारे, पेट्रोल पंप कर्मचारी, मजूर तसेच बेरोजगार तरुण मोठ्या प्रमाणावर या ॲपच्या जाळ्यात अडकले आहेत. अंदाजानुसार २ ते ३ कोटी रुपयांचा आर्थिक घोटाळा झाल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवला जात आहे.

नावी ॲपने मोबाईल रिचार्जच्या नावाखाली तरुणांना मोठ्या रकमेच्या कर्जाच्या जाळ्यात ओढले आहे. आता ॲपकडून पैसे वसूल करण्याची जबरदस्ती सुरू झाली आहे. बँक खात्यावर होल्ड टाकून ही रक्कम वसूल केली जात आहे. त्यामुळे तरुण बँकांकडे धाव घेत आहेत. मात्र, बँक अधिकाऱ्यांनी स्पष्ट केलं की, या व्यवहारांशी बँकेचा कोणताही संबंध नाही आणि ग्राहकांनी स्वतःहून युपीआयद्वारे व्यवहार केले आहेत. फसवणुकीच्या या प्रकारात अनेकांनी आपल्या मित्र-नातेवाईकांचे मोबाईलनंबर वापरून रिचार्ज केले. त्यामुळे आता त्यांच्या नावावरही पैसे काढण्याचा धोका निर्माण झाला आहे. पैसे कुठून भरणार? हा मोठा प्रश्न या तरुणांसमोर उभा आहे.

**राज्यभरात मोठ्या घोटाळ्याची भीती**

ढोकी गावासह धाराशिव जिल्ह्यातील अनेक गावांत हा प्रकार समोर आला आहे. हा घोटाळा केवळ एका गावापुरता सीमित नसून राज्यभर अनेक जण याला बळी पडल्याची भीती व्यक्त केली जात आहे. सध्या फसवणुकीबाबत अधिकृत तक्रारी दाखल होण्याची शक्यता आहे.या संपूर्ण प्रकारामुळे महाराष्ट्रात नावी ॲपच्या विश्वासार्हतेवर मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. याप्रकरणी पोलिसांनी तक्रारींची दखल घेतली असून, लवकरच या घोटाळ्याचा तपास सुरू होण्याची शक्यता आहे.



## संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# थोडी संवेदनशीलता बाळगा

पुण्यातील स्वारगेट एसटी बस आगारातील बलात्काराच्या प्रकरणाने संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. एका २६ वर्षीय तरुणीवर बलात्कार करून फरार झालेला आरोपी दत्तात्रय गाडे याला बेड्या ठोकण्यात पुणे पोलिसांना तीन दिवसांनी यश आले आहे. दत्तात्रय गाडेने कायम झोपेत असलेल्या एसटी आगारातील सुरक्षा व्यवस्थेचा गैरफायदा उचलत पीडितेवर शिवनेरी बसमध्ये कूकर्म केले होते. सावज हेरण्यासाठी गाडे दररोज स्वारगेट बस आगाराच्या आवारात फिरायचा असे कळते. पीडितेवर बलात्कार करून तो फरार झाला होता. या प्रकरणी गुन्ह्याची नोंद होताच पोलिसांनी १३ पथके गाडेच्या मागावर पाठवली होती. अखेर कधी घरात, कधी शेतात, कधी डॉग स्क्वॉडच्या, तर कधी ड्रोनच्या मदतीने शोध घेतल्यानंतर शिरूरच्या गुनाट गावातील एका शेतात लपून बसलेल्या गाडेला पोलिसांनी ताब्यात घेतले. दुसरीकडे या घटनेनंतर खडबडून जाग आलेल्या एसटी प्रशासनाने परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या आदेशावरून २३ सुरक्षा रक्षकांना तात्काळ निलंबित केले. आता या सुरक्षा रक्षकांच्या जागी नवीन सुरक्षा रक्षकांची नेमणूक होईल, एसटी बसमध्ये जीपीएस आणि आगारांमध्ये सीसीटीव्ही लावले जातील. पुढचे काही दिवस राज्यभरातील एसटी आगारातील दुरवस्थेच्या बातम्या प्रसिद्ध होतील आणि हळूहळू करत प्रशासकीय व्यवस्था पुन्हा एकदा निद्राधीन होईल. आज स्वारगेट प्रकरणामुळे महाराष्ट्रात महिला सुरक्षेच्या मुद्यावरून चर्चा झडत आहे, काल याच चर्चेच्या केंद्रस्थानी पुण्याच्या भोपदेव घाटात एका तरुणीवर झालेल्या बलात्काराचा विषय होता, तर त्याआधी बदलापूरमध्ये दोन लहानग्या चिमुरड्यांवर झालेला लैंगिक अत्याचार राज्यभरात गाजत होता. कालच नालासोपाऱ्यात एका नराधम बापाने पोटच्या ४ मुलींवर वारंवार बलात्कार केल्याचे प्रकरण पुढे आले. हे कुटुंब आधी कणकवलीत राहायचे. कुख्यात गुंड असलेला हा बाप मागील काही वर्षांपासून या मुलींवर बलात्कार करत होता. त्यातील मोठ्या मुलीला अनेकदा गर्भपातही करावा लागला होता. परंतु बापाच्या भीतीमुळे या मुलींनी आपले तोंड उघडले नाही. नालासोपार्यात एका नातेवाईकाकडे राहायला आल्यावर मोठ्या धाडसाने या मुलींनी पोलिसांत तक्रार नोंदवली. यानंतर पोलिसांनी सिंधुदुर्गातून आरोपी बापाला अटक केली. मोठ्या मुलीने आधीच पोलीस ठाणे गाठले असते, तर कदाचित तिच्या लहान बहिणी बापाच्या अत्याचाराच्या बळी ठरल्या नसत्या, असे अकलेचे तारे आता काहीजण तोडू लागले आहेत. अगदी त्याचप्रमाणे भोपदेव घाटात तरुणी मित्रासोबत एकटी फिरायला कशाला गेली होती? असे विषय व्हॉट्सॲप युनिव्हर्सिटीवर चघळले जात होते. स्वारगेट प्रकरणातही बलात्कार होत असताना ती तरुणी ओरडली का नाही, असाच प्रश्न काही अक्कलशून्य महाभागांकडून उपस्थित केला जात आहे. ती तरुणी एवढ्या भल्यापहाटे गावी जाण्यास निघालीच कशी? अनोळखी माणसाबरोबर अंधाऱ्या बसमध्ये गेलीच कशाला? तिने आरडाओरडा अर्थात प्रतिकार न केल्यामुळेच आगारातील सुरक्षा रक्षकांना ही गोष्ट कळू शकली नाही, असे निरर्थक प्रश्न उपस्थित केले जात आहे. दुर्दैवाने असे प्रश्न उपस्थित करणाऱ्यांच्या कंपूत जेव्हा राज्याचे गृहराज्यमंत्री आणि राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा सामील होतात, तेव्हा समाज म्हणून आपलीच आपल्याला लाज वाटायला लागते. गृहराज्यमंत्री योगेश कदम यांचे वक्तव्य असंवेदनशील आहे. माध्यमांनीच आपल्या वक्तव्याचा विपऱ्यास केला अशी सारवासारव करण्यात आता काहीच अर्थ नाही. शासन म्हणून कायदा सुव्यवस्थेची जबाबदारी आपल्या खांद्यावर आहे, याचा जणू कदम यांना विसर पडला असावा. कदाचित नैतिकदृष्ट्या तरुणीला आरोपीच्या पिंर्जयात उभे करून ही जबाबदारीच झटकण्याचा योगेश कदम यांनी प्रयत्न केला असावा. अत्याचार झाला, पण मुलीने विरोध केला नाही म्हणजे ते या आरोपीला अप्रत्यक्षरित्या क्लिन चीट देत आहेत का? एसटी बस आगारात सुरक्षा रक्षक तैनात असतानाही तरुणीची अब्रू लुटली जाते, याचे गांभीर्य त्यांना वाटत नाही का? जेव्हा समाजातूनच असे प्रश्न उपस्थित होऊ लागतात, तेव्हा सामाजिक दबावापोटी लैंगिक अत्याचाराला बळी ठरलेल्या महिला पुढे येण्याचे टाळतात, हा आतापर्यंतचा अनुभव आहे. यातूनच मग पुन्हा महिलांच्या हतबलतेचा फायदा नराधम पुरुषांकडून घेतला जातो, मग तो कुणाचा शेजारी असतो किंवा ऑफिसमधला सहकारी वा बॉस. नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोच्या आकडेवारीनुसार राज्यात महिलांविरोधातील अत्याचाराची दररोज १३० ते १५० प्रकरणे नोंदविली जातात. भारतात दर १६ मिनिटांनी एक महिला लैंगिक अत्याचाराची बळी ठरते. शहर, गावखेड्यांचा विकास होत असताना सामाजिक मूल्य मात्र हरवत चालले आहे. महिलांसोबत कुठेही, कधीही अत्याचाराच्या घटना घडू शकतात, याला महिलांचे वागणे, बोलणे, त्यांनी घातलेले कपडे हे सर्व कारणीभूत नसून पुरुषांची विकृत मानसिकता आहे. योगेश कदम यांनी याप्रकरणी अधिक संवेदनशीलपणे बोलायला हवे होते, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. योगेश कदमांचे कान त्यांनी टोचले हे बरे झाले. पण सोशल मीडिया नावाच्या चावडीवर महिला अत्याचाराविषयी व्यक्त होताना सर्वसामान्यांनीही थोडी संवेदनशीलता बाळगायला हवी.

# कायदेमंडळ धडा घेणार तरी कधी?

**बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांची 'पलटूराम' अशी संभावना करतानाच त्यांच्या व्यंगाची टिंगल करीत खिल्ली उडविल्याबद्दल राष्ट्रीय जनता दलाचे सुनीलकुमार सिंह यांची आमदारकी कायमस्वरूपी रद्द करण्याचा बिहार विधान परिषदेचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने रद्दबातल ठरवला.**



बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांची 'पलटूराम' अशी संभावना करतानाच त्यांच्या व्यंगाची टिंगल करीत खिल्ली उडविल्याबद्दल राष्ट्रीय जनता दलाचे सुनीलकुमार सिंह यांची आमदारकी कायमस्वरूपी रद्द करण्याचा बिहार विधान परिषदेचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने रद्दबातल ठरवला. न्यायपालिकेकडून कितीदा कानउघाडणी केल्यावर आपण वठणीवर यायचे, याचा विचार आता विधिमंडळांना करावा लागेल. सुनीलकुमार सिंह हे लालूप्रसाद यादव यांचे निकटवर्तीय. त्यांच्या हकालपट्टीची शिफारस विधान परिषदेच्या नीतिमत्ता समितीने केली; मग लगोलग सभापतींनी त्यांचे सदस्यत्व कायमस्वरूपी रद्द केले. निवडणूक आयोगाने या जागेसाठी पोटनिवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला होता. 'सिंह यांचे सभागृहातील आचरण हे घृणास्पद आणि निंदनीय तर आहेच, पण त्यांना देण्यात आलेली शिक्षा अधिक आणि प्रमाणाबाहेरची आहे' अशा शब्दांत विधान परिषद सभापतींचा आदेश न्यायालयाने रद्दबातल ठरविला. परिणामी सिंह यांची आमदारकी पुनर्स्थापित झाली. न्यायालयाने आमदारांच्या निलंबनावरून अध्यक्ष वा सभापतींना फटकारण्याचा हा काही पहिलाच प्रकार नाही. तीन वर्षांपूर्वी महाराष्ट्र विधानसभेतील भाजपच्या १२ आमदारांच्या निलंबनावरूनही सर्वोच्च न्यायालयाचे तत्कालीन न्यायमूर्ती अजय खानविलकर यांच्या खंडपीठाने ताशेरे ओढले होते. महाविकास आघाडीचे सरकार सत्तेत असताना ओबीसी समाजाच्या राजकीय आरक्षणावरून झालेल्या गोंधळात गिरीश महाजन, आशीष शेलार यांच्यासह १२ आमदारांना एक वर्षासाठी विधानसभेतून निलंबित करण्यात आले होते. सदस्यांनी सभागृहात गैरवर्तन करणे चुकीचेच पण त्यासाठी फार तर अधिवेशनाचा कालावधी संपेपर्यंत शिक्षा द्यावी, असे निरीक्षण नोंदविले होते. तसेच एक वर्षाची शिक्षा ही अति असल्याचे मत व्यक्त करीत १२ आमदारांचे निलंबन तात्काळ रद्द केले होते. 'समाजात अवतीभोवती घडणाऱ्या घटनांचे प्रतिबिंब कायदेमंडळातील चर्चेत उमटत असते' असे भाष्यही न्या. खानविलकर यांनी तेव्हा केले होते. तमिळनाडू, गुजरात, ओडिशासह काही राज्यांमधील आमदारांच्या निलंबनावरून सर्वोच्च न्यायालयाने शिक्षेच्या विरोधातच निकाल दिले होते. मुख्यमंत्र्यांची सभागृहात त्यांच्या व्यंगावरून किंवा आजारपणावरून खिल्ली उडविणे हे केव्हाही गैरच. या गैरवर्तनावरून आमदाराची कायमस्वरूपी हकालपट्टी करण्याचा बिहारमधील संयुक्त जनता दल-भाजप सरकारचा निर्णयाही मनमानीपणाचाच म्हणावा लागेल. कायदेमंडळ, कायार्पालिका किंवा प्रशासन, न्यायपालिका आणि माध्यमे हे लोकशाहीचे चार खांब. सर्व यंत्रणांचे अधिकारही घटनेत निश्चित केलेले. कोणत्याही यंत्रणेने दुसऱ्या यंत्रणेच्या कारभारात हस्तक्षेप करू नये, असे सार्वत्रिक संकेत असतात. पण ही लक्ष्मणरेषा कोणीच पाळत नाही, अशी काहीशी विचित्र परिस्थिती अलीकडच्या काळात निर्माण झाली आहे. आपण म्हणजे जणू काही मालकच अशी कायदेमंडळातील सदस्य म्हणजे खासदार वा आमदारांची भावना असते. कायदेमंडळ कोणालाही उत्तरदायी नाही, असाच एक समज रूढ झालेला. त्यातूनच 'न्यायालयाने पीठासीन अधिकाऱ्यांना नोटीस वा समन्स पाठविले तरी ते स्वीकारू नये,' असे ठरावच महाराष्ट्र विधानसभेत करण्यात आले आहेत. न्यायपालिकेलाही कोणाचाही हस्तक्षेप सहन होत नाही. याचे अगदी ताजे उदाहरण म्हणजे उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींची चौकशी करण्याचा अधिकार असल्याचा लोकपालांच्या आदेशाला सर्वोच्च न्यायालयाने गेल्याच आठवड्यात दिलेली स्थगिती... पण तो निराळा विषय. विधिमंडळाला विशेष अधिकार असले तरी विधिमंडळाच्या सदस्यांची कृती, विधिमंडळाने घेतलेले निर्णय हे न्यायालयीन कक्षेत येतात. यामुळेच बिहारमधील आमदारकी रद्द करण्याच्या खटल्यात कायदेमंडळाच्या कृतीची तपासणी करण्याचा न्यायालयाला अधिकार आहे हे न्यायालयाने पुन्हा एकदा अधोरेखित केले. विधिमंडळ मनमानीपणा करू शकत नाही हाच संदेश यातून मिळतो. शिवसेना व राष्ट्रवादीतील फुटीनंतर आमदारांच्या अपात्रतेच्या याचिकांवर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर हे निर्णय घेण्यास विलंब लावत होते. त्यावरून सर्वोच्च न्यायालयाने नार्वेकर यांना फटकारले होते. त्यांना ठरावीक मुदत न्यायालयानेच घालून द्यावी लागली होती. महाराष्ट्र विधानसभा अध्यक्षांचे न्यायालयात एवढे कधीच वाभाडे निघाले नव्हते. त्याच नार्वेकर यांची भाजपने पुन्हा विधानसभा अध्यक्षपदी निवड केली. आमदारकी रद्द करण्याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने रद्दबातल ठरविला ते एका अर्थाने योग्यच झाले. अन्यथा आपल्या विरोधात बोलणाऱ्या सदस्याला अशाच पद्धतीने अपात्र ठरविण्याचे एक आयुधच सत्ताधाऱ्यांना मिळाले असते. कायदेमंडळ, कार्यपालिका किंवा न्यायपालिकांवर अंकुश हवाच. महाराष्ट्र काय किंवा बिहारच्या निकालांवरून न्यायपालिकेने कायेदमंडळाचे कान टोचूनही कायदेमंडळ त्यातून धडा घेत नाही हे दुर्दैव.

# ॲस्ट्रोकेमिस्ट्री आणि इलेक्टॉन



खगोल शास्त्रज्ञांनी विविध अंतराळ मोहिमांतून आतापर्यंत ३३० रेणूंचे ब्रह्मांडातील अस्तित्व सिद्ध केले आहे. यासाठी त्यांनी इन्फ्रारेड स्पेक्ट्रोस्कोपीचा वापर केला. यात अनेक सेंद्रिय रेणूंचाही (ऑरगॅनिक मॉलिक्युल) समावेश आहे. या ब्रह्मांडात जीवसृष्टी असलेला पृथ्वी हा एकमात्र ग्रह आपल्याला माहीत आहे. शास्त्रज्ञ पृथ्वीसम इतर ग्रहांच्या शोधात आहेत; परंतु पृथ्वीवर या जीवसृष्टीची सुरुवात कशी झाली, हाही अनुत्तरित प्रश्न आहे. तो उकलण्यासाठी ब्रह्मांडात हे विविध रेणू उत्पन्न कसे झाले, हे समजणे अत्यंत महत्त्वाचे आहे. ॲस्ट्रोकेमिस्ट्री म्हणजेच खगोल रसायनशास्त्र हे या दृष्टीने केले गेलेले मूलभूत संशोधन. या संशोधनात मुख्यत्वे तीन प्रकारे काम होते. सर्वप्रथम, अंतराळ मोहिमांद्वारे ब्रह्मांडातील विविध रेणू शोधणे. दुसरे म्हणजे, त्या रेणूंना ओळखण्यासाठी विविध स्थिर आणि अस्थिर रेणूंचे स्पेक्ट्रा प्रयोगशाळेत मोजणे आणि त्यांचा डेटाबेस बनवणे आणि तिसरे म्हणजे, प्रयोगशाळेत अंतराळसदृश परिस्थिती निर्माण करून ब्रह्मांडात सापडलेले रेणू निर्माण करणे. या संशोधनातून असा अंदाज वर्तवला जात आहे की प्रकाश, विशेषतः अतिनील किरणे, कॉस्मिक किरणे, आणि त्यांमुळे अंतराळातील धूलिकणांपासून निघणारे मुक्त इलेक्ट्रॉन हे या रेणूंच्या निर्मितीमागील रासायनिक अभिक्रियांत भाग घेतात. ताऱ्यांच्या मृत्यूसमयी होणाऱ्या त्यांच्या स्फोटांतून हे धूलिकण निर्माण होऊन ते अंतराळात दूर फेकले जातात. तिथे तपमान खूप कमी असते (उणे २६३ अंश सेल्सिअस) आणि अशा परिस्थितीत या धूलिकणांवर विविध मूलद्रव्यांच्या बर्फांचे थर जमतात. अतिनील किरणे आणि कॉस्मिक किरणांमुळे या मूलद्रव्यांचे आयनीकरण होऊन त्यांत रासायनिक अभिक्रिया होतात.

# महाराष्ट्र की मिर्झापूर?



**पुण्यासारख्या शहरातील सुखवस्तू नागरिकांस 'आमच्या भागाचे बीड होऊ देऊ नका' असे काकुळतीने म्हणावेसे वाटते; याचे कारण राजकारणाचा अतिरेक...**

कोणताही एक प्रदेश, राज्य वा देश हा गुन्हेगारीमुक्त असूच शकत नाही. माणसे आहेत तेथे गुन्हा आलाच. यातील प्रत्येकास पोलिसांनी संरक्षण द्यावे ही अपेक्षाही अयोग्य. हे वास्तव मान्य केले की पुणे येथील स्वारगेट बस स्थानकात झालेल्या बलात्काराबद्दल सरकारला बोल लावता येणार नाही. सरकारला दोष द्यायला हवा तो गुन्हेगारांस अभयारण्यसदृश सुरक्षित वातावरण या राज्यात निर्माण होऊ दिल्याबद्दल. पुण्यातील या बलात्कार घटनेच्या आसपास शहराच्या काही भागात लागलेले फलक या अभयारण्याचे सूतोवाच करतात. आमच्या भागाचे रूपांतर 'बीड'मध्ये होण्यापासून वाचवा, अशी हाक एकेकाळी 'ऑक्सफर्ड ऑफ द ईस्ट' म्हणवून घेणाऱ्या, ज्ञानमार्गी ज्ञानकेंद्री उद्योगांसाठी ओळखल्या जाणाऱ्या पुण्यासारख्या शहरातील नागरिकांस द्यावी लागत असेल तर त्यातून या अभयारण्याची चाहूल लागते. आणि हे सारे पुण्यात. तिकडे मराठवाड्यात जे काही सुरू आहे त्यास अद्यापही अंत नाही. उत्तर महाराष्ट्रातल्या नाशकातील गुंड हे या सगळ्यांपेक्षा अधिक शहाणे. त्यांनी राजकारण्यांची मदत घेण्याऐवजी स्वतःच राजकारणी बनण्यास प्राधान्य दिले आणि गुंडांची एकमेकांस बघून घेईन ही भाषा राजकारणात आणली. विदर्भाची परिस्थिती काही वेगळी नाही. कोकणात उद्याच्या महाराष्ट्राचे 'हिंदुहृदयसम्राट' बनू पाहणारे किती मोकाट सुटलेले आहेत ते सगळ्या महाराष्ट्रासमोर आहेच. तेथील मालवणात नुकत्याच झालेल्या भारत-पाकिस्तान क्रिकेट सामन्यानंतर एका १५ वर्षांच्या मुलाने कथित देशविरोधी घोषणा दिल्याच्या तक्रारीवर जे काही घडले ते कायद्याचे राज्य संकल्पनेशी फारकत घेणारे नाही, असे म्हणता येणे अवघड. ही सर्व परिस्थिती काय दर्शवते?

राज्याची कायदाशून्यतेकडे सुरू असलेली वाटचाल. एकट्या पुण्यात गेल्या काही दिवसांत घडलेल्या घटनांचा आढावा घेतला तरी हे सत्य लक्षात येईल. या ताज्या बलात्कार घटनेनंतर त्या जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार मोठ्या तोंडाने म्हणतात गुन्हेगारांस फाशी द्या. हा आरोपी अद्याप पोलिसांना सापडलेलाही नाही. त्याआधी लक्षात घ्यावी अशी बाब म्हणजे या गुन्ह्यास वाचा फुटायला २४ तास का लागावेत? बलात्कारासारखे गुन्हे सिद्ध होण्यासाठी कमीत कमी कालापव्यय आवश्यक असतो. येथे तर गुन्ह्याची वाच्यता व्हायलाच २४ तास लागले. तरीही प्रशासनाचा अनुभव इत्यादी असलेले अजितदादा आरोपीच्या फाशीची मागणी करतात तेव्हा ते त्यांच्या पक्षाच्या अतिवाचाळ महिला प्रवक्त्यांच्या पातळीवर येतात. आरोप सिद्ध करून त्यास जरूर फाशी द्या; पण त्यासाठी आधी त्याला अटक तरी करा! ते जमत नाही, पुण्यासारख्या ह्यसीसीटीव्हीह्लयुक्त शहरात घडलेल्या गुन्ह्यातील आरोपीस पकडण्यासाठी लाखा-लाखांचे बक्षीस लावण्याची वेळ यांच्यावर येते आणि तरीही केवळ आपणास किती चाड आहे हे दाखवण्यासाठी असल्या मागण्या करायच्या. हा आरोपी राजकीय कार्यकर्ता असल्याचे बोलले जाते आणि त्याच्याविरोधात आणखीही काही गुन्हे असल्याचे दिसते. वास्तव तसे असल्यास अजिबात आश्चर्य नाही.

कारण अलीकडे 'राजकारण हा बदमाशांचा शेवटचा अड्डा' हे सत्य पूर्णपणे बदलले असून राजकारण हे बदमाशांचे पहिले आश्रयस्थान झालेले आहे. राज्याचा कोणताही भाग यास अपवाद नाही. वाटेल ते गुन्हे करून बिनबोभाट सन्मानाने जगता यावे म्हणून राजकीय आश्रय घ्यायचा आणि या अशा गुन्हेगारांच्या फौजाच्या फौजा सुरक्षितपणे पोसता याव्यात यासाठी राजकारण्यांनी कायम सत्तासावलीत राहायचे, हे आपले वास्तव. सत्तेतून गैरमार्गाने अधिकाधिक पैसा करायचा, तो करण्यासाठी वाटेल ते गैरउद्योग करण्यास तयार असणारे भणंग तरुण पदरी बाळगायचे आणि हे सर्व अबाधित राहावे म्हणून जिकडे सत्ता तिकडे आश्रय मिळवत राहायचे हे सध्याचे महाराष्ट्राचे राजकारण. पुण्यातील आणखी एका प्रकरणी ते दिसून आले. हे प्रकरण रस्त्यावरील वादाचे पर्यवसान मारामारीत होण्याचे. यात ज्यास मारहाण झाली तो 'आपला' कार्यकर्ता निघाला म्हणून केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी हस्तक्षेप केला. त्यामुळे मारहाणीची दखल घेण्याची तत्परता स्थानिक पोलिसांनी दाखवली. हे ठीक. पण सत्तेसमोर लवलवत्या कंबरांनी झुलणाऱ्या पोलिसांनी या गुंडांस 'मोक्का' लावला. तेही एक वेळ ठीक. पण ज्यांच्याविरोधात हे गुन्हे दाखल केले गेले तेही दुसऱ्या एका सत्तापक्षीय नेत्याचे समर्थक निघाले. म्हणजे मारहाण ज्यास झाली तोही सत्तापक्षीय समर्थक आणि ज्यांनी केली तेही सत्तापक्षीयांत ऊठबस असलेले. हे दोघेही सत्तापक्षीय स्थानिक नेते कोण हे समस्त पुणेकर जाणतात. तेव्हा जे झाले त्यातून एक प्रश्न निर्माण होतो.

तो म्हणजे सत्ताधारी पक्षाचा कार्यकर्ता असूनही पुण्यासारख्या शहरात एखाद्याची अशी परवड होत असेल तर सामान्यांचे काय? सदर प्रकरणात मारहाण सहन करावी लागलेली व्यक्ती सामान्य असती तरी मी त्यात हस्तक्षेप केला असता, असे मोहोळ महाशय म्हणतात. पण त्यांचा इतिहास अशा सच्छील कृत्यांच्या नोंदींनी ओसंडून वाहतो आहे असे नाही. इतके दिवस पालकमंत्री अजित पवार, पालकमंत्रीपदेच्छुक भाजपचे चंद्रकांत पाटील यांच्याभोवती फिरणाऱ्या पुण्यातील राजकारणास मिळालेला हा तिसरा मुरलीधर कोन. तथापि राजकारण्यांबाबत 'जितके अधिक तितके भले' असे म्हणण्यासारखी परिस्थिती सध्याच्या महाराष्ट्रात नाही. उलट जितके अधिक सत्ताधीश तितक्या अधिक समस्या असाच अनुभव नागरिकांस सर्वत्र येतो. पुण्यासारख्या शहरातील सुखवस्तू नागरिकांस ह्यआमच्या भागाचे बीड होऊ देऊ नकाह्ल असे काकुळतीने म्हणावेसे वाटते यातून हे सत्य समोर येते. खरे तर हीच भावना राज्यातील जवळपास प्रत्येक शहर, खेडी यांचीही आहे. ही वेळ महाराष्ट्रावर का आली?

राजकारणाचा अतिरेक हे याचे प्रामाणिक उत्तर. आणि राजकारण म्हणजे केवळ सत्ताकारण, हे ओघाने आलेच. हे सत्ताकारण का करायचे? कारण विकास हवा. विकास म्हणजे काय? तर आपल्या आसमंतातील जमिनी वाटेल तशा लुबाडण्याचा, लुबाडलेल्या जमिनींवर वाटेल तशी बांधकामे करण्याचा, वाटेल तशा बांधकामांतून वाटेल तशी नामी/ बेनामी संपत्ती निर्माण करण्याचा सुलभ आणि सुरक्षित मार्ग. असे हे दुष्टचक्र. ते एवढ्यावर थांबत नाही. सत्ताकारण केले की वाटेल ती पापे अत्यंत सुरक्षितपणे दडवता येतात आणि ती पचवून प्रतिष्ठेचा ढेकरही देता येतो, ही सोय आहेच. ती फक्त सत्ताधाऱ्यांनाच असल्याने प्रत्येकास विकासासाठी सत्तेची सुरक्षित ऊब हवी. हे सर्व याआधी नव्हते असे नाही. पण इतके दिवस हे सारे सामान्यांच्या जगण्यावर उठलेले नव्हते आणि जनसामान्यांस त्याची धग लागत नव्हती. तथापि कालाच्या ओघात या राजकारण्यांची संख्या इतकी वाढली की त्यांचे राजकारण आता जनसामान्यांच्या जगण्याचा सहज संकोच करू लागले आहे. 'आमचे बीड होऊ देऊ नका' ही आर्त हाक या वेदनेतून येते. यातही अर्थात 'त्यांच्या' पक्षाचे राजकारणी विरुद्ध 'आमच्या' पक्षाचे असा भेदाभेद आहेच. पण तरीही काही किमान सभ्यासभ्यतेच्या मुद्द्यांवर मतैक्य होईल/ व्हावे असे नागरिक अद्यापही शिल्लक असतील.

तसे नसेल तर महाराष्ट्राचे मिझार्पूर होणे फार दूर नाही. ''आप हमको घर की ओनरशिप समझा रहे हैं, हमें तो पूरा शहर लेना है'' असे त्या मालिकेतील एक गुंड पात्र म्हणते. सध्या राज्यात जे सुरू आहे ते तसेच सुरू राहिले तर त्यातील पात्रे या संवादातील शहराऐवजी राज्यावर मालकी सांगण्यास मागे-पुढे पाहणार नाहीत.

# आत्मघाती अहंमन्य!

**रशियाने झेलेन्स्की यांच्या युक्रेनवर केलेला हल्ला 'रास्त' आणि पॅलेस्टिनी भूमीत इस्रायलचा अमानुष अतिरेक गोड मानून घ्यावयाचा असेल तर उद्या चीन याच मार्गाने तैवानचा घास घ्यायला गेल्यास त्यास हे कोणत्या हाताने रोखणार? ट्रम्प व पुतिन यांच्या मानसिकतेत मूलतः काहीही फरक नसल्याचेच वारंवार दिसल्यास, अनेक धुरीणांस जगाची घडी नव्याने बसवावी असे वाटणार...**



आपल्या पूर्वसुरी विरोधकांनी जे केले त्याच्या नेमकी उलट कृती करणे, त्यांना बोल लावणे, त्यांना अयोग्य ठरवणे यातच स्वतःच्या कृतीची योग्यता शोधणारे जगाच्या पाठीवर कमी नाहीत. यांचा समजेचा अवकाश मर्यादित असतो आणि स्वतःच्या शहाणपणापेक्षा आपल्या पूर्वजांना मूर्ख ठरवणे इतकीच त्यांची झेप असते. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे अशांतील एक. अमेरिकेसारख्या प्रबळ आणि प्रभावशाली देशाचे नेतृत्व अशा व्यक्तीकडे जाणे हे त्या देशाचे आणि त्यापेक्षाही अधिक जगाचे दुर्दैव. ट्रम्प यांनी अमेरिकेच्या अध्यक्षपदाची सूत्रे हातात घेऊन जेमतेम दोन महिनेही झालेले नाहीत; पण आपण काय काय उत्पात घडवू शकतो याची चुणूक दाखवण्याची एकही संधी त्यांनी सोडलेली नाही. आपल्या विजयाची इच्छा बाळगणाऱ्यांचे तर नाक पुरते ठेचल्याखेरीज ट्रम्प थांबणार नाहीत असे दिसते. यात अमेरिकेतील रिपब्लिकन जसे येतात, तसे भारतात त्यांच्या विजयासाठी देव पाण्यात घालून बसणारे येडबंबू विचारांधळेही येतात.

यातील पहिल्या वर्गातील शहाणे- म्हणजे अमेरिकेतील रिपब्लिकनांतील काही- ट्रम्प यांच्याविरोधात व्यक्त होऊ लागले असून दुसऱ्या वर्गात हे शहाणपण झिरपण्यास अंमळ वेळ जावा लागेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी 'नको नको' म्हणत असताना, नाराजी व्यक्त करत असताना आपण त्यांना आयात करवाढीसंदर्भात कसे सुनावले याची जाहीर आणि अत्यंत असभ्य फुशारकी ट्रम्प यांनी मारली असली तरी ती अनेकांची 'अगली बार... 'ची झिंग उतरवण्यास पुरेशी असेलच असे नाही. असो. त्या- म्हणजे भारतासंदर्भातील- विषयास स्पर्श करण्याची संधी यापुढे वारंवार देण्यास ट्रम्प समर्थ आहेत. तूर्त युक्रेन आणि रशिया या संदर्भात त्यांनी तोडलेल्या ताऱ्यांबाबत.

त्यात कहर आहे तो 'रशियाशी युद्ध युक्रेनचे अध्यक्ष झेलेन्स्की यांनीच सुरू केले' हे ट्रम्प यांचे विधान. त्यामुळे खुद्द ट्रम्प यांच्या रिपब्लिकन पक्षात खळबळ उडाली असून साऊथ कॅरोलायना, साऊथ डाकोटा, आयोवा इत्यादी प्रांतांचे लोकप्रतिनिधी ट्रम्प यांच्या या भूमिकेपासून फारकत घेताना दिसतात. ही संख्या तूर्त लहान असेल. पण ही केवळ सुरुवात आहे आणि ट्रम्प यांना अध्यक्षपदी येऊन दोन महिनेही झालेले नाहीत. इतकेच नाही तर काही वृत्तवाहिन्यांच्या पाहण्यांत निम्म्यापेक्षा अधिक सहभागींनी 'ट्रम्प अती करत आहेत' असे मत नोंदवले. या सगळ्यामुळे ट्रम्प यांस तूर्त तरी काही फरक पडणार नाही. कारण आपल्या आधीचे आणि त्यातही डेमॉक्रॅटिक पक्षाचे नेतृत्व वेडे ठरवणे हीच ट्रम्प यांच्या शहाणपणाची परिसीमा. तथापि यामुळे अमेरिकेचे जागतिक राजकारणातील एकंदर स्थानच धोक्यात आले असून युक्रेनच्या मुद्द्यावर त्यांनी घेतलेल्या जाहीर भूमिकेने जगभरात अनेकांनी अमेरिकेवर यापुढे किती विश्वास ठेवावा असा प्रश्न विचारला आहे. ते योग्यच. याचे साधे कारण असे की अमेरिकेचे जागतिक अस्तित्वच मुळी अवलंबून आहे ते रशियाविरोधातील दुसरा ध्रुव असे.

पण ट्रम्प महाशय तेच पुसून टाकायला निघालेले दिसतात. आपला इतिहास पुसून नवा इतिहास लिहिण्याची त्यांची घाई इतकी की ते युक्रेन-रशिया युद्धासाठी झेलेन्स्की यांना जबाबदार धरतात आणि त्यांची संभावना 'हुकूमशहा' अशी करण्यापर्यंत ट्रम्प तात्यांची मजल जाते. हा वेडाचार असाच चालत राहिला तर जगातील खरा लोकशाहीवादी म्हणून ते पुतिन यांस मिठीत घेण्याचा क्षण फार दूर नाही. सारे जग जाणते की तीन वर्षांपूर्वी २४ फेब्रुवारी या दिवशी पुतिन यांनी युक्रेनवर हल्ला केला आणि त्या देशास स्वतंत्र अस्तित्वाचा अधिकार नाही असे भाष्य केले. आता त्या पुतिन यांस काहीही बोल न लावता ट्रम्प चक्क झेलेन्स्की यांनाच दोष देणार. यातून एक बाब ठसठशीतपणे स्पष्ट होते. ती म्हणजे अध्यक्षपदी विराजमान होण्याआधीच ग्रीनलँडवर हक्क सांगणारे, पनामा कालवा परत द्या अशी मागणी करणारे आणि हलवायाच्या घरावर तुळशीपत्र ठेवल्यासारखे इजिप्त आदी देशांना पॅलेस्टिनींना सामावून घ्या असा 'आदेश' देणारे ट्रम्प आणि जॉर्जियास हात घालणारे, युक्रेनवर हल्ला करणारे पुतिन यांच्या मानसिकतेत मूलतः काहीही फरक नाही. हे सत्य वारंवार समोर येणार असेल तर त्यामुळे अनेक धुरीणांस जगाची घडी नव्याने बसवावी असे वाटणार आणि तसे करावे लागणार.

त्याची सुरुवात झाल्याची चिन्हे दिसतात. ज्या पद्धतीने इंग्लंड, फ्रान्स आणि जर्मनी या देशांनी अधिकृतपणे ट्रम्प यांच्यापासून फारकत घेत झेलेन्स्की यांना जाहीर पाठिंबा दिला त्यात या आगामी रचनेची चिन्हे दिसतात. या तीनही देशांच्या प्रमुखांनी स्वतंत्रपणे झेलेन्स्की यांच्याशी संपर्क साधला आणि रशियाविरोधातील संघर्षात उघड पाठिंबा जाहीर केला. याचा अर्थ ''झेलेन्स्की यांना जायला एकही देश उरणार नाही'' ही ट्रम्प यांची ताजी दर्पोक्ती अमेरिकेच्याच एकेकाळच्या मित्रदेशांनी फोल ठरवली. हे यापुढे वारंवार होईल. ग्रहताऱ्यांत काहीही चांगले-वाईट, शुभ-अशुभ नसते असेच मानत असला तरी केवळ लोकप्रिय उपमा म्हणून ट्रम्प आणि पुतिन यांचे एकाच वेळी सत्तेत असणे हे 'राहू-केतू एकाच घरात' असल्यासारखे म्हणावे लागेल. यातील पुतिन यांनी आपण तहहयात अध्यक्षपदी राहू अशी तजवीज केलेली आहे आणि आपल्यालाही तसे काही करायला आवडेल अशी इच्छा ट्रम्प यांनी व्यक्त केलेली आहे. तेव्हा हे संकट इतक्यात तरी काही संपुष्टात येण्याची शक्यता नाही. तसे होईल तेव्हा होवो. पण ट्रम्प यांच्या या भूमिकेमुळे आणखी एक गंभीर समस्या निर्माण होऊ शकते.

ती म्हणजे चीन. पुतिन यांच्या रशियाने झेलेन्स्की यांच्या युक्रेनवर केलेला हल्ला रास्त ठरत असेल, पॅलेस्टिनी भूमीत इस्रायलचा अमानुष अतिरेक गोड मानून घ्यावयाचा असेल तर उद्या चीन याच मार्गाने तैवानचा घास घ्यायला गेल्यास त्यास हे कोणत्या हाताने रोखणार? हे कल्पनाचित्र नाही. उंबरठ्यावर येऊन ठेपलेले वास्तव असून त्याचा अंदाज आत्मप्रेमात आकंठ बुडालेल्या ट्रम्प यांस आहे किंवा काय हा प्रश्नच. परत तो विचारणार कोण हा दुसरा प्रश्न. स्वतःच्याच प्रेमात पडलेल्याचा प्रेमभंग अशक्य असतो. पण या आत्मप्रेमींमुळे जगावरील विद्यमान आणि भावी संकटांस सामोरे कसे जावे याचा विचार शहाणपण शाबूत असलेल्या धुरीणांस तातडीने करावा लागेल. ती वेळ येऊन ठेपली आहे. ''माझ्याशी कोणी वाद घालू शकत नाही'' असे ट्रम्प म्हणतात. ते खरे आहे. कारण अशा आत्मप्रेमीशी वाद घालण्यापेक्षा दगडी भिंतीवर डोके आपटणे कमी वेदनादायी याचे भान सर्वांस असल्याने ट्रम्प यांच्याशी वाद घालण्यास जाणार कोण? तसे करून वेळ दवडण्यापेक्षा युक्रेनला वाचवायचे कसे, पॅलेस्टिनींना आधार द्यायचा कसा याचा मार्ग शोधणे अधिक गरजेचे आहे.

''मातृभूमीच्या भल्यासाठी जो काम करतो त्याच्याकडून कधीही कायदेभंग होत नाही'' अशा अर्थाचे अत्यंत भंपक ट्वीट हे ट्रम्प करतात. आपण काहीही केले तरी ते देशासाठीच आहे असे म्हणण्याची सोय राजे-सम्राटांना असते कारण त्यांच्या कृतीचे मूल्यमापन करण्याची मुभा प्रजेस नसते. ट्रम्प यांचा प्रवास त्या दिशेने सुरू आहे. ''लाँग लिव्ह द किंग'' असे दुसऱ्या ट्वीटमध्ये ते स्वतःच्याच निर्णयास उद्देशून म्हणतात. हा प्रकार अहंमन्य अमेरिकेसाठी आत्मघातकी ठरेलच; पण जगासाठीही तितकाच घातकी ठरेल, हे निःसंशय.

# पॅनकेक
## झटपट आणि चविष्ट

**साहित्य :-** २ वाटी मैदा किवा गव्हाचे पीठ, ३ चमचे पिठीसाखर, १ चमचा बेकिंग पावडर, अर्धा चमचा बेकिंग सोडा, ३ चमचे तूप, १ ते दिड वाटी दूध. १ चमचा, व्हॅनिला एस्सेंस

**कृती:-** मैदा, पिठीसाखर, बेकिंग पावडर आणि बेकिंग सोडा, व्हॅनिला, मेल्टेड तुप हे सर्व साहित्य व्यवस्थित एकत्र करुन घ्यावे. यानंतर यामध्ये थोडे-थोडे दुध घालून मिश्रण थोडे सैलसर करावे. इडलीच्या मिश्रणाप्रमाणे हे मिश्रण तयार झाले पाहीजे. जास्त पातळ करु नये. आता हे मिश्रण पाच मिनिटासाठी झाकून ठेवावे. यानंतर (अगदी बारीक आचेवर) नॉनस्टीक पॅन वरती थोडेसे तुप लावून घ्यावे, व त्यावर पळीने थोडे-थोडेसे मिश्रण घालावे (फुलक्या एवढेच लहानसे पसरावे). एका बाजुने भाजून दुसया बाजूनेही सोनेरी सर भाजून घ्यावे. ही अगदी साधीसोपी एगलेस पॅन केकेची रेसिपी आहे.



**टिप्स -**

● बेकिंग सोडा आणि बेकिंग पावडर या दोघांचे गुणधर्म वेगवेगळे आहेत. त्यामुळे हे दोन्ही वापरले जाते. ● जर या मिश्रणामध्ये बेकिंग सोडा ऐवजी एक अंडे फेटून घातले तर तो पॅनकेक ही चविष्ट लागतो.

# मजबूत केसांसाठी आहारात सामील करा या वस्तू

केसांच्या सुंदरतेसाठी आपण काय नाही करत.. स्पा, तेलाने मॉलिश आणि वेगवेगळे सौंदर्य प्रसाधने देखील वापरात आहात. परंतु काही आहार आपल्या केसांच्या सौंदर्यतेला आणि बळकटीला परत मिळवून देऊ शकतात. ते ही कुठल्याही प्रकाराचा त्रास न घेता. जाणून घेउया हे 5 आहार ज्यांचा सेवनाने आपल्या केसांच्या समस्यांचं निरसन होऊ शकतं.

**पालक:** पालक खाणं फायदेशीर असतं. आरोग्याबरोबरच हे आपल्या केसांच्या गळतीला ही थांबवत. यात मुबलक प्रमाणात आयरन (लोखंड) मुबलक आढळल्यामुळे केसांसाठी हे वरदान ठरतं.



**गाजर :** लाल गोड गाजर चवी बरोबरच आपल्याला चांगले आरोग्य आणि सौंदर्य देखील देतं. तसेच हे व्हिटॅमिन ए चे चांगले स्रोत आहे. त्याच बरोबर यामध्ये असलेले कॅरोटीन आपल्या केसांना आणि डोळ्यांना सुरक्षित आणि सुंदर ठेवतं. आपल्या केसांना मूळापासून हे बळकट करत.



**दही:** दही खाल्याने देखील केसांची गळती थांबते. केस सुंदर आणि चमकदार बनतात. यामध्ये असलेले व्हिटॅमिन बी ६ आणि व्हिटॅमिन डी आपल्या केसांना नवे चैतन्य आणि चांगले आयुष्य देतं.

**रताळे :** ह्याला गोड बटाटा देखील म्हणतात. यात व्हिटॅमिन ए मुबलक प्रमाणात आढळतं. जे आपल्या केसांना बळकट करून केसांची गळती थांबवतं. आपल्या मुळांमध्ये आढळणारं तेल देखील सुरक्षित ठेवतं. जेणे करून आपल्या केसांना पोषण मिळतं.

**बेदाणे :** आपल्या केसांची वाढ होत नसल्यास काळजी करु नये. बेदाणे खाल्याने आपल्या केसांची जलद गतीने वाढ होते. यामध्ये आयरन( लोखंड) आणि मिनरल्स (खनिजे) मुबलक प्रमाणात असतात. जे आपल्या केसांना पोषण देतं.

# कडू कारल्याचे १४ गुणकारी फायदे वाचा आणि लगेच अमलात आणा

हिरव्या भाज्यांमध्ये आपल्याकडे आकर्षित करणारं कारलं चवीला कडू जरी असले, तरी ही त्यापासून मिळणारे अनेक फायदे नक्की गोड आहेत. आपणास ठाऊक आहे का कारल्याचे हे आरोग्यविषयक फायदे ? जर नाही तर मग नक्की जाणून घेऊया कारल्याचे फायदे...



● कारल्यामध्ये फास्फोरस मुबलक प्रमाणात आढळतं. हे कफ, बद्धकोष्ठता आणि पचनासंबंधी समस्या दूर करतं. कारल्याचा सेवनाने अन्नाचे पचन व्यवस्थित होते. तसेच भूक सुद्धा मोकळेपणाने लागते.

● दम्याचा त्रास असल्यास कारलं खूपच फायदेशीर ठरतं. या आजारात कारल्याची भाजी काही ही मसाले ना वापरता देखील भाजी बनवून खाल्याने फायदेशीर ठरतात.

● पोटात गॅस बनत असल्यास आणि अपचनामध्ये कारल्याच्या रस घेणे चांगलेच असते, जेणे करून आपल्यापासून हे आजार लांबच राहतं.

● कारल्याचा रस प्यायल्याने आपले यकृत बळकट होतच, त्याचबरोबर यकृताचे सर्व त्रास बरे होतात. दररोज नियमाने हे घेतल्यास एका आठवड्यात चांगले परिणाम दिसून येतात. कावीळ मध्ये देखील हे फायदेशीर आहे.

● कारल्याची पाने किंवा फळाला पाण्यात उकळवून प्यायल्याने, रोग प्रतिकारक शक्ती वाढते, आणि कुठल्याही प्रकाराचे संसर्ग झाल्यास बरे होतात.

● उलट्या, जुलाब, किंवा कॉलरा झाला असल्यास कारल्याचा रसात काळंमीठ टाकून प्यायलास लगेच आराम मिळतो. जलोदर झाला असल्यास देखील दोन चमचे कारल्याचा रस पाण्यामध्ये टाकून प्यायल्याने फायदा होतो.

● अर्धांगवायूचा त्रास झाला असेल तरी ही कारलं खाणे खूप प्रभावी उपाय आहे. त्यात कच्च कारलं रुग्णासाठी फायदेशीर आहे.

● रक्त स्वच्छ करण्यासाठी देखील कारलं अमृता सारखे आहेत. मधुमेहाचा आजारांसाठी देखील हे प्रभावी मानले आहे. मधुमेह असल्यास एक चतुर्थांश कप कारल्याचे रस, तेवढ्याच प्रमाणात गाजराचा रस पिणे शरीरासाठी फायदेशीर आहे.

● रक्ताळ मूळव्याध झाली असल्यास 1 चमचा कारल्याच्या रसात अर्धा चमचा साखर टाकून प्यायल्यास मूळव्याधीच्या त्रासात आराम मिळतो.

● संधिवात किंवा हातपायाची जळजळ होत असल्यास कारल्याच्या रस चोळणे फायदेशीर असतं.

● मूत्रपिंड (किडनी)च्या त्रासासाठी कारल्याचे उकळलेले पाणी आणि कारल्याचा रस दोन्हीही फायदेशीर असतात. ह्याचा सेवनाने मूत्रपिंड सक्रिय होऊन शरीरातील हानिकारक पदार्थांना शरीराच्या बाहेर काढते.

● हृदयाच्या विकारांसाठी कारलं हे रामबाणच आहे. हे हानिकारक चरबीला हृदयाचा रक्तवाहिन्यांमध्ये जमा होऊ देत नाही. यामुळे रक्त पुरवठा व्यवस्थित होतो आणि हृदयाघात होण्याची शक्यता नसते.

● लिंबाच्या रसाबरोबर कारल्याचे रसाला चेहऱ्यावर लावल्याने मुरूम बरे होतात, आणि त्वचेचे आजार होत नाही.


● कर्करोगाशी लढण्यासाठी कारल्याच्या रसाचे सेवन करणे फायदेशीर ठरते.

# गुगल क्रोम मराठीत कसं वापरायचं? जाणून घ्या सोपी पद्धत

**जर** तुम्ही गुगल क्रोम इंग्रजी व्यतिरिक्त मराठी व अन्य भाषांमध्ये देखील वापरता येतं. जाणून घ्या भाषा बदलण्याची सोपी गुगल क्रोम जगभरातील सर्वाधिक वापरल्या जाणाऱ्या वेब ब्राउजर पैकी एक आहे. लोक वेब ब्राउजिंगसाठी गुगल क्रोमला पसंती देतात कारण ह्याचा युजर इंटरफेस सोपा आहे. गुगल क्रोममध्ये अनेक असे फीचर्स आहेत जे उपयुक्त ठरतात. त्यात अनेक भाषांचा सपोर्ट देखील दिला जतो. गुगल क्रोम सुरुवातीपासून इंग्रजी भाषेत येतो पण ह्यात इतर भाषांचा सपोर्ट देखील आहे. जर तुम्हाला इंग्रजी भाषेत ब्राऊजर वापरायचं नसेल तर तुम्ही क्रोम मराठीसह अन्य स्थानिक भाषेत वापरू शकता. गुगल क्रोम वर आपल्या आवडीची भाषा बदलणं खूप सोपं आहे. जर तुम्ही देखील इंग्रजी व्यतिरिक्त क्रोम इतर भाषेत वापरू इच्छित असाल तर हे आर्टिकल तुम्हाला उपयुक्त ठरेल. आज आम्ही तुम्हाला लॅपटॉप, कंप्यूटर, अँड्रॉइड फोनमध्ये गुगल क्रोमची भाषा बदलण्याची सोपी पद्धत सांगणार आहोत.

**पीसी वर क्रोम भाषा बदला**

- गुगल क्रोमची भाषा बदलण्यासाठी तुम्हाला सर्वप्रथम आपल्या लॅपटॉप किंवा कंप्यूटरमध्ये गुगल क्रोम ओपन करावं लागेल.
- त्यानंतर लेफ्ट कॉर्नरवरील तीन डॉट मेन्यू ऑप्शनवर क्लिक करा आणि मग सेटिंग्स वर जा.
- इथे तुम्हाला लेफ्ट कॉर्नरवर Labguages चा ऑप्शन दिसेल.
- आता Add Languages वर क्लिक करा.
- Add Languages मध्ये तुम्हाला मराठीचा ऑप्शन दिसेल. तिथे क्लिक करून तुम्ही क्रोम मराठी व इतर भाषेत वापरू शकता.





- आता रिस्टार्टवर क्लिक करून गुगल क्रोम तुम्ही मराठी वापरू शकता.

**एंड्राइड वर क्रोम भाषा बदला**

- फोनवर गुगल क्रोमची भाषा बदलण्यासाठी सर्वप्रथम तुमच्या अँड्रॉइड फोनमध्ये गुगल क्रोम ओपन करा.
- त्यानंतर टॉप-लेफ्ट कॉर्नरवरील तीन डॉट मेन्यूवर क्लिक करा.
- सेटिंग्समध्ये जाऊन Lanfguages वर जा.
- त्यानंतर गुगल क्रोम वर जाऊन मराठी भाषा निवडा.
- भाषा डाउनलोड झाल्यानंतर रिस्टार्टवर टॅप करा आणि मराठीत क्रोम वापरण्यास सुरुवात करा.

**नोटः** पुन्हा इंग्रजी भाषेत क्रोम वापरायचं असल्यास तुम्ही वरील प्रोसेस पुन्हा फॉलो करू शकता.

# आंघोळीच्या पाण्यात चिमुटभर मीठ मिसळण्याचे ४ आरोग्यदायी फायदे

**बदलत्या** वातावरणाचा परिणाम जसा थेट आरोग्यावर होतो तसाच तो त्वचेवरही होतो. ऋतूमानामध्ये बदल झाल्यानंतर त्वचाविकार जडण्याची शक्यता असते. त्वचाविकार हे काही काळापुरते वाढत असतात. अशावेळेस सुरूवातीच्या टप्प्यामध्ये अनेकदा लोकं आजाराकडे लक्ष देत नाही. जसाजसा त्रास वाढतो तसा त्रास अधिक गंभीर होऊ शकतो. म्हणूनच वेळीच या समस्येला रोखण्यासाठी पाण्यामध्ये चिमूटभर मीठ मिसळा.

**मीठ पाण्याने आंघोळ करण्याचे फायदे –**

● स्कीन इन्फेक्शनचा धोका टाळण्यासाठी आंघोळीच्या पाण्यात मीठ मिसळणं फायदेशीर आहे. या पाण्याच्या आंघोळीमुळे खाज येण्याच्या समस्येपासून सुटका मिळू शकते.


● त्वचेला तजेलदार ठेवण्याची क्षमता मीठाच्या पाण्यामध्ये आहे.कारण मीठ जंतूनाशक म्हणूनही काम करते.

● सांधेदुखीचा त्रास असर्णाया व्यक्तींना मीठाच्या पाण्याने आंघोळ करणं अधिक फायदेशीर आहे.

● कंबरेच्या दुखण्यावरही मीठाचे पाणी फायदेशीर आहे. मीठ आणि पाणी हे मिश्रण जसे जंतूनाशक असते तसेच दाहशामकदेखील आहे.

# पिस्ता खाण्याचे हे फायदे ऐकून तुम्हीही व्हाल अवाक्

सुकामेवा हे बहुतेकदा श्रीमंती खाणे समजले जाते. आर्थिकदृष्ट्या तर ते श्रीमंत आहेतच; पण पोषक तत्त्वे आणि आरोग्याच्या दृष्टीनेही सुकामेव्यातील अनेक घटक श्रीमंत आहेत. म्हणूनच सुकामेवा खाणं गरजेचं आहे. सुक्यामेव्यामध्ये वापरला जाणारा पिस्ता सर्वांनाच परिचित आहे. पिस्ता हे छोट्या आकाराचे चविष्ट व कठीण कवचाचे पौष्टिक फळ आहे. त्याचे कवच टणक, परंतु द्विदल असते. पिस्त्याच्या गरावर एक साल असते. त्याच्या आतील गराचा रंग हिरवट पिवळा असतो. पिस्त्याचे झाड आकाराने खूप मोठे व डौलदार असते. त्याच्या फांद्या समांतर व सर्व बाजूंनी सारख्या असून पानांनी बहरलेल्या असतात. पिस्त्याची झाडे इराण, अफगाणिस्तान, फ्रान्स, अमेरिका, तुर्कस्तान या भागामध्ये जास्त आढळतात. पिस्त्याला संस्कृतमध्ये म्युकुलका किंवा निकोचक, हिंदीमध्ये पिस्ता, इंग्रजीमध्ये पिस्ताचिओनट व शास्त्रीय भाषेत पिस्तासिया व्हेरा या नावाने ओळखले जाते.



### औषधी गुणधर्म

पिस्ता चवीला मधुर, किंचित कडवट, उष्ण, वीर्यात्मक असून पित्तकर व कफवातघ्न आहे. तो पचायला जड व धातूंचे पोषण करणारा आहे. पिस्त्यामध्ये कॅल्शिअम, फॉस्फरस, लोह, प्रथिने, खनिजे, तंतुमय व पिष्टमय पदार्थ व जीवनसत्त्व हे सर्व घटक भरपूर प्रमाणात असतात.

### उपयोग -

● पिस्त्यामध्ये जीवनसत्त्वातील थायमिन, नायसिन, रिबोफ्लेविन, कॅरोटीन हे घटक असल्यामुळे मज्जा संस्थेच्या कार्यासाठी पिस्ता सेवन उत्तम ठरते. दुधामध्ये पिस्त्याची पूड टाकून प्यायल्यास मेंदूचे कार्य उत्तम प्रकारे चालते. थकवा, नैराश्य ही लक्षणे जाणवत नाहीत.

● स्मृतिभ्रंश, विस्मरण जाणवत असेल तर नियमितपणे ४ ते ५ पिस्ते दुधात टाकून खावेत.

● चांगले कोलेस्टेरॉल निर्माण होऊन हृदयविकार टाळण्यासाठी नियमितपणे पिस्ता सेवन करावे.

● बदाम, पिस्ता, खडीसाखर दुधात घालून त्याची खीर बनवावी व ही खीर नियमितपणे रोज सकाळी सेवन केल्यास शारीरिक व मानसिक आरोग्य चांगले राहते.

**सावधानता**

सहसा पिस्ते खारवून साठवण्याची पद्धत आहे. परंतु असे पिस्ते जास्त प्रमाणात खाणे आरोग्यास घातक आहे. अतिप्रमाणात मिठाचा वापर केल्यामुळे त्यात असणारे पौष्टिक व औषधी घटक काही प्रमाणात नाश पावतात. म्हणून त्याऐवजी न खारवलेले साधे पिस्तेही बाजारात मिळतात. त्यांचा वापर करावा. तेही नुसतेच खाल्ले तरी ते शक्तिदायक, आरोग्यपूर्ण, सकस असतात.

● पिस्त्यामध्ये विपुल प्रमाणात लोह असल्याने त्याच्या सेवनाने रक्त वाढते.

● पिस्त्याची फुले ही श्वसननलिकेतील व फुप्फुसातील वाढलेला कफ दूर करतात, म्हणून जुनाट खोकला, सर्दी, दमा यावर ही फुले गुणकारी ठरतात.

● मिठाईच्या शोभेसाठी व चव वाढवण्यासाठी पिस्त्याचा वापर करावा. घरगुती आइस्क्रीम, केक, बिस्कीट करताना सजावटीसाठी पिस्त्याचा वापर करावा.

● पिस्त्यामध्ये पौष्टिक घटक भरपूर असल्याने त्याच्या सेवनाने जंतूंविरुद्धची रोगप्रतिकारकशक्ती वाढते. त्यामुळे लहान मुलांना व रुग्णांना नियमितपणे दुधातून पिस्ते द्यावेत.

# गरम पाणी पिण्याचे फायदे

**जर** आपण त्वचेच्या समस्येने अस्वस्थ आहात किंवा त्वचेसाठी वेगवेगळी सौंदर्यप्रसाधने वापरून थकला असाल तर दररोज गरम पाणी पिणे सुरू करा. यामुळे आपली त्वचा समस्येतून मुक्तता होईल आणि चेहराही उजळेल.

- सकाळी उपाशीपोटी आणि रात्री जेवल्यानंतर गरम पाणी प्यायल्याने पचन समस्याही दूर होते.
- गरम पाणी पिण्याचे खूप फायदे असतात; ज्यामुळे शरीराला ऊर्जा मिळते. याने कफ आणि सर्दी लवकर दूर होते.
- वजन कमी करण्यातही गरम पाणी खूप मदत करते. गरम पाण्यात थोडं लिंबू किंवा काही थेंब मधाचे मिसळून प्यायल्याने वजन कमी होण्यास मदत मिळते.
- नेहमी तरुण दिसण्याची इच्छा ठेवणाऱ्यांसाठी गरम पाणी एका अतिशय चांगल्या औषधाचे काम करतं.
- दमा, उचकी इत्यादी आजारात आणि तळलेले पदार्थ खाल्ल्यानंतर गरम पाणी खूप उपयोगी असते.



# सडपातळ दिसायचे आहे
## मग कपड्यांमध्ये या रंगांचा वापर करा

कपड्यांची खरेदी करताना स्टाईल, वर्क, पॅटर्न असे विविध पैलू पडताळून पाहिले जातात. काही महिला पटकन कपडे खरेदी करतात, तर काही महिलांना निवड करायला बराच वेळ लागतो. अर्थात, कपड्यांच्या खरेदीत रंगांचीही महत्त्वाची भूमिका असते. म्हणूनच आपल्या व्यक्तिमत्त्वाला, बांध्याला साजेशा रंगांची निवड करणं आवश्यक आहे. ठरावीक रंगाच्या कपड्यांची निवड केल्यास स्थूल महिलाही बारीक दिसू शकतात. चला तर मग, अशाच काही रंगांविषयी जाणून घेऊ.



### गडद रंगाचे कपडे

काळ्या रंगाच्या कपड्यांमध्ये तुम्ही बारीक दिसू शकता. काळा हा गडद रंग आहे. गडद रंग व्यक्ती बारीक असल्याचा आभास निर्माण करतात. काळ्यासोबतच नेव्ही ब्लू, ब्राऊन, चॉकलेटी, मरून, डार्क ग्रे असे रंगही तुम्ही निवडू शकता.

### गडद रंगाचा बॉटम आणि ब्राईट टॉप

बारीक दिसण्यासाठी प्रत्येक वेळी एकाच रंगाचे कपडे घालणं गरजेचं नाही. तुम्ही लाईट आणि डार्क रंगांचं कॉम्बिनेशनही करू शकता. गडद रंगाच्या बॉटमवर ब्राईट टॉप घालता येईल. लाल आणि गुलाबी रंगाच्या छटा असणारे कपडेही खरेदी करता येतील. या रंगाचे ब्राईट कपडे लूक स्थूल कपड्यांची तुम्हाला स्लिम देतील. त्यामुळे महिलांनी खरेदी करताना रंगसंगतीकडे अधिक लक्ष द्यायला हवं.





### मोनोक्रोमॅटिक शेड्स

मोनोक्रोमॅटिक शेड्सही तुम्हाला स्लिम लूक मिळवून देतील. मोनोक्रोमॅटिक लूकमध्ये शरीराचा स्थूलपणा लपतो. मोनोक्रोमॅटिक लूक म्हणजे एकाच रंगाचे कपडे परिधान करणं.

# मशरूम खाण्याचे फायदे वाचाल, तर आवडत नसेल तरीही खाल

**कुत्र्याची छत्री** म्हणून ओळखले जाणारे मशरूम म्हणजे वनस्पतीवर वाढणारी नैसर्गिक खाण्यायोग्य बुरशीच असते. वनस्पती आणि प्राणी या दोन्हींचे काही गुणधर्म मशरूम्समध्ये असतात. वनस्पतीत न आढळणारं 'ड' जीवनसत्त्व त्यात असतं. मशरूम्स लो कॅलरी, लो सोडियम आणि फॅट फ्री असल्यामुळे त्यांच्या सेवनामुळे वजन आटोक्यात राहू शकतं, फळांप्रमाणे मशरूम्स ग्लुटेन फ्री असतात. त्यात ॲन्टीऑक्सिडन्ट्स तर आहेतच, याशिवाय सेलेनियम, कॉपर यांसारखी खनिजं आणि पोटॅशियमही आहे. मशरूम्स हा 'बी' जीवनसत्त्वाचा एक चांगला स्रोत आहे. मशरूम पटकन शिजतात, सूप, पुलाव, भाज्या यात त्यांचा उपयोग केला जातो. फक्त मशरूम खाण्यायोग्य आहेत की नाहीत, हे बघून घ्यावं लागतं. कारण काही मशरूम्स विषारी असतात.



मुख्य म्हणजे ही फळभाजी पूर्णपणे सेंद्रीय आहे. रासायनिक पदार्थांचा वापरच होत नाही, त्यामुळे ती भेसळ करून बनवता येत नाही. यात असणारे प्रोटीन हे प्राथमिक दर्जाचे आहेत, म्हणजे शरीरास जसे हवे तसे ते आहेत. मशरूमचा वापर ज्या देशात मोठ्या प्रमाणावर होतो, तेथे दरडोई वर्षाला ७० किलोपर्यंत त्याचा वापर होतो. भारतात हे प्रमाण केवळ अर्धा किलो इतके आहे. उच्चभ्रू लोकच याचा वापर करतात. उत्तरेप्रमाणेच तामिळनाडू, कर्नाटक या परिसरातही मशरूमचे उत्पादन घेतले जाते. लग्नसमारंभात या भाजीला मानाचे स्थान आहे. प्रोटीन शरीरात जाण्यासाठी मटन, मासे, दूध, सोयाबीन याचा वापर होतो मात्र शून्य कोलेस्टेरॉल असणारा एकमेव पदार्थ म्हणून मशरूमची ओळख आहे. मशरूम तयार करण्यासाठी लागणारा कच्चा माल म्हणजे शेतीत ज्याला टाकाऊ पदार्थ म्हणून ओळखले जाते अशी सोयाबीन व गव्हाची गुळी, शिवाय साखर कारखान्यात शिल्लक राहिलेला बगॅस (उसाचा रस काढून शिल्लक राहिलेला चोथा) याला सर्वाधिक महत्त्व आहे. २५ दिवसांत या कच्च्या मालाचे खत तयार केले जाते. त्यात कोंबडीची विष्ठा, जिप्सम, डीओसी मिसळून त्यानंतर मशरूमचे उत्पादन मिळण्यासाठी ५० दिवसांचा कालावधी लागतो. पुढील १५ ते २० दिवस हे उत्पादन विक्रीस उपलब्ध होते. आपल्या देशात १९६८ साली आयसीएआर दिल्ली येथे हिमाचल प्रांतातील सोलन येथे मशरूमचे संशोधन करणारे केंद्र सुरू झाले.

# नारळाचे तेल... त्वचेसाठी वरदान

**कित्येक** शतके आपण आपल्याकडे परंपरेने चालत आलेल्या अनेक घरगुती उपायांचा अवलंब करत आलो आहोत. पण जसजसा काळ बदलला, तसतसे हे उपाय देखील काहीसे बदलत गेले. आपल्या आसपासच्या वातावरणामध्ये सतत वाढती कमान असलेले प्रदूषण, आपली बदलती जीवनशैली यांच्यामुळे आपले आरोग्य, त्वचा आणि केस यांच्यावर दुष्परिणाम दिसून येऊ लागले आहेत. त्यामुळे आपल्या आरोग्याच्या बदलत्या गरजांनुसार आपण आपल्या केसांच्या, त्वचेच्या आरोग्याकरिता करत असलेल्या उपायांमध्येदेखील बदल करण्याची गरज आहे. यासाठी बाजारामध्ये अनेक तऱ्हेची प्रोडक्ट्स उपलब्ध आहेत. पण केवळ एका वस्तूने आपण आपली त्वचा, आणि केस यांची उत्तम काळजी घेऊ शकतो, ते म्हणजे नारळाचे किंवा खोबरेल तेल. नारळाच्या वापराने त्वचेवर फ्री रॅडीकल्सचे परिणाम नाहीसे होतात. खोबरेल तेलामध्ये अँटीऑक्सिडंट्सचे प्रमाण जास्त आहे. यामुळे त्वचेतील घातक द्रव्ये बाहेर पडण्यास मदत होते. सर्व प्रकारच्या त्वचेसाठी नारळाचे तेल गुणकारी आहे. याच्या नियमित वापराने त्वचेवरील सुरकुत्या नाहीशा होण्यास मदत होते. नारळाच्या तेलाचे गुण आणखी वाढविण्याकरिता त्यामध्ये कापूर घालून हे तेल चेहऱ्याला लावावे व दहा मिनिटे चेहऱ्यावर राहू द्यावे. या कापूरमिश्रित तेलाने त्वचेची निरनिराळी इन्फेक्शन्स दूर होण्यास मदत होते. हे मिश्रण बनवण्यासाठी शंभर ग्रॅम नारळाच्या तेलामध्ये एक कापुराची वडी मिसळावी. त्वचेवरील भाजल्याचे वण, त्वचेवरील भेगा, त्वचेवर आलेले काळे डाग हटविण्यासाठी कापूर मिश्रित तेल वापरावे.



# पुणे बलात्कार प्रकरण...
## मुख्यमंत्र्यांची ठाण्यात वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांसोबत बैठक!

■**ठाणे** : पुणे येथील तरुणावरील लैंगिक अत्याचार प्रकरण, महिला सुरक्षा, बीड येथील सरपंचाची हत्या, राज्यातील ढासळलेली कायदा सुव्यवस्थेचे प्रकरण ताजे असतानाच मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी शनिवारी राज्यातील सर्व वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची विशेष बैठक ठाण्यातील रेमंड गेस्ट हाऊसमध्ये घेत आहेत. या बैठकीस राज्याच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांच्यासह मुंबई, ठाणे राज्यभरातील अतवरिष्ठ पोलीस अधिकारी उपस्थित राहणार आहेत. या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस काय आदेश देतात याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे.

स्वारगेट येथे शिवशाही बसगाडीमध्ये झालेल्या लैंगिक अत्याचाराची घटना घडली. या प्रकरणातील आरोपीला अटक झाली असली तरी राज्यातील महिला सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. दुसरीकडे अल्पवयीन मुली, तरुणी, महिला यांचे अपहरण, अत्याचाराच्या घटना वारंवार उघडकीस येत आहेत. तसेच बीड येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी देखील सरकावर विरोधी पक्षाकडून टीका केली जात आहे. ठाण्यात कोयते, तलवारी घेऊन काही गुंडानी दहशत पसरविण्याचा देखील प्रयत्न केला होता. या सर्व पार्श्वभूमीवर राज्यातील कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आल्याचा आरोप करत महायुती सरकारवर विरोधक आणि महाविकास आघाडीचे नेते झोड उठवित आहेत. राज्यातील कायदा सुव्यवस्थेच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी ठाण्यात राज्यातील सर्व पोलीस अति वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची बैठक रेमंड येथील गेस्ट हाऊसमध्ये आयोजित केली आहे.

राज्य पोलीस क्रीडा स्पर्धांचे आयोजन ठाण्यात करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचा समारोप शनिवारी दुपारी ३.३० वाजता होणार आहे. या कार्यक्रमास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित राहणार आहेत. तत्पूर्वी ते शनिवारी सकाळी ही बैठक घेत असल्याने पोलीस अधिकाऱ्यांना घाम फुटला आहे. या बैठकीस राज्याच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांच्यासह मुंबई, ठाणे पोलीस आणि राज्यातील इतर महत्त्वाच्या भागातील पोलीस आयुक्त, अधिकारी उपस्थित राहणार आहेत. या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे कायदा सुव्यवस्थे विषयी आढावा घेणार आहेत. तसेच पोलीस दलाच्या कामकाजाची माहिती यात घेतली जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे या बैठकीकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागून आहे. मुख्यमंत्री फडवणीस हे पोलीस अधिकाऱ्यांना कोणते आदेश देणार आहेत हे आता पाहावे लागणार आहे.



## मला बदनाम करण्याचे कट कारस्थान
## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

■**ठाणे** : काही लोक मला बदनाम करण्याचा कट कारस्थान करत आहेत. परंतु माझ्यासोबत महाराष्ट्राची जनता आहे. त्यामुळे माज्या केसालाही धक्का लागणार नाही असे वक्तव्य उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. शिवसेना शिंदे गटाच्या वतीने शनिवारी ठाण्यातील डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृहात 'एकनाथ पर्व – आपला लाडका भाऊ' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांशी संवाद साधला. काही लोक मला बदनाम करण्याचा कट कारस्थान रचत आहेत. परंतु माझ्यासोबत महाराष्ट्राची जनता आहे. त्यामुळे माझ्या केसालाही धक्का लागणार नाही. मी चार भिंतीत रमणारा नाही. तर कामामध्ये आणि लोकांच्या सेवेत रमणारा आहे असे शिंदे म्हणाले. माज्या अडीच वर्षांच्या कामाची नोंद महाराष्ट्राच्या जनतेने घेतली. मी कर्तव्य म्हणून काम केले. ह्यएकनाथ पर्वह्ण हे विकासाचे, महाराष्ट्रातल्या समृद्धीचे पर्व होते असेही ते म्हणाले. राज्याचे महत्त्वाचे पद भूषवित असतानाही मी पायाला भिंगरी लावून फिरलो. अडीच वर्षात प्रचंड कामे केली. लोकाभिमुख, कल्याणकारी योजना राबविल्या. सर्वसामान्यांच्या कुटुंबाची ओढाताण काय होते मी पाहिले आहे. त्यामुळे मी लाडकी बहिण योजना राबविल्याचे त्यांनी सांगितले. माझ्या गावी मी शेती केली. कारण मी शेतकऱ्याचा मुलगा आहे. परंतु गावी गेल्यावर बातम्या सुरु होतात, एकनाथ शिंदे नाराज आहेत असा टोलाही त्यांनी लगावला. ठाणे हे माझे जीवाचे प्राण आहे. माज्यात कधीही बदल होणार नाही. कारण दिवंगत आनंद दिघे यांच्या मुशीत मी घडलो आहे. आज ठाण्याचा विकास होत आहे. काही प्रकल्प, योजना ठाण्यात सुरु झाले. त्यानंतर हे प्रकल्प राज्यात सुरू झाल्याचेही ते म्हणाले. अडीच वर्षांपूर्वी आम्ही उठाव केला. शिवसेना वाचविण्यासाठी मी धाडस केले. आता राज्याला पुढे नेण्याचे काम करायचे आहे. आम्ही शासन आपल्या दारी योजना राबविली. जिथे संकट असते. तिथे मी पोहचतो. विरोधकांनी सर्व प्रकल्पांना विरोध केला होता. परंतु मी या विरोधकांचा विरोध मोडून काढला. दिवंगत बाळासाहेब ठाकरे हे कार्यकर्त्यांना सवंगडी समत होते. परंतु आताचे लोक कार्यकर्त्यांना घरगडी समजत होते असा टोला त्यांनी नाव न घेता उद्धव ठाकरे यांना लगावला.



# कोकणवासियांना 'शिमगोत्सवाचे वेध'
## ७० टक्के बसगाड्यांचे आरक्षण पूर्ण, समूह आरक्षणालाही उत्तम प्रतिसाद



**७० टक्के आरक्षण पूर्ण**

कोकणात जाणाऱ्या गाड्यांचे जिल्ह्यातील विविध आगारांमधून ७० टक्के आरक्षण पूर्ण झाले आहे. तर प्रवाशांच्या मागणी नुसार गाडीचे समूह आरक्षण देखील केले जाते. यामध्ये समूह आरक्षण केलेल्या प्रवाशांच्या शहरात बस थेट जाऊन त्यांना तेथून त्यांच्या इच्छित स्थळी पोहचवते. सद्दस्थितीत ठाणे एसटी विभागातून सुमारे १० गाड्यांचे समूह आरक्षण पूर्ण झाले आहे.

■**ठाणे** : उपजीविकेसाठी आपल्या कुटुंबियांसह जिल्ह्यात स्थायिक झालेल्या कोकणवासीयांना आता शिमगोत्सवाचे वेध लागले आहेत. ठाणे परिवहन विभागातर्फे शिमगोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या प्रवाशांसाठी ११ ते १३ मार्च या कालावधीत यंदा ८० ते ८५ बसगाड्यांचे नियोजन करण्यात आले आहे. यातील ७० टक्के गाड्यांचे आरक्षण पूर्ण झाले असून उर्वरित गाड्यांची आरक्षणाची प्रक्रियाही लवकरच पूर्ण होणार असल्याची माहिती ठाणे एसटी विभागातर्फे देण्यात आली आहे. तर समूह आरक्षणाला ही प्रवाशांकडून चांगली पसंती मिळत आहे.

होळीसणाच्या मुहूर्तावर साजरा केल्या जाणाऱ्या शिमगोत्सवासाठी कोकणवासी आपल्या कुटुंबियांसह गावी आवर्जून जातात. शिमगोत्सवासाठी कोकणात आपल्या मूळ गावी जाणाऱ्या नागरिकांसाठी एसटी, रेल्वे प्रशासनाच्या माध्यमातून अतिरिक्त गाड्या उपलब्ध करून देण्यात येतात. मात्र तरीही अनेकदा प्रवाशांना गर्दीचा सामना करावा लागतो. यासाठी परिवहन विभागाकडून आगाऊ आरक्षण, समूह आरक्षण, शहरातच एसटीची सुविधा उपलब्ध करून देणे यांसारख्या अनेक सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. याला प्रवाशांकडून ही चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे मागील दोन वर्षात दिसून आले आहे. तसेच ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास, महिलांना एसटी प्रवासात पन्नास टक्के सवलत यामुळे ज्येष्ठ वर्ग आणि महिला वर्ग गेल्या वर्षभराच्या कालावधीत एसटी प्रवासाकडे वळल्याचे एसटी विभागाची प्रवाशी आकडेवारीवरून स्पष्ट झाले होते. याच पार्श्वभूमीवर कोकणवासीयांसाठी गणेशोत्सवाप्रमाणेच शिमगोत्सवासाठी देखील अतिरिक्त बसगाड्यांची नियोजन करण्यात आले असून याला प्रवाशांकडून उत्तम प्रतिसाद मिळत आहे.

होळीच्या आठ दिवस आधीपासूनच कोकणात शिमगोत्सवाची जोरदार तयारी केली जाते. यासाठी कोकणवासी मोठ्या संख्येने जातात. यंदा १३ मार्च रोजी होळी सण आहे. यासाठी ठाणे एसटी विभागातील आठ आगारांमध्ये सुमारे ८५ गाड्यांचे नियोजन करण्यात आले आहे. ११ मार्च ते १३ मार्च या तीन दिवसांच्या कालावधीत कोकणातील विविध तालुक्यांमध्ये या गाड्या धावणार आहेत. तर प्रवाशांची अधिक मागणी असल्यास अधिक गाड्यांचे नियोजन करण्यात येणार असल्याची माहिती ठाणे विभागीय परिवहन अधिकारी धनंजय शिंदे यांनी दिली आहे.

# वर्षभरात १३०० हून अधिक वाहन चोरी



**वाहनांचे प्रकार - चोरीस गेलेली वाहने**
- दुचाकी - ९९४
- तीन चाकी - २३१
- चार चाकी - ८५
- अवजड वाहने - ३५
- **एकूण - १३४५**

■**ठाणे** : तुमचे वाहन रस्त्याकडेला उभे असल्यास ते चोरट्यांच्या नजरेपासून सुरक्षित आहे की नाही याची खात्री करा. कारण तुमचे वाहन केव्हा चोरी होईल सांगता येत नाही. ठाणे आयुक्तालय क्षेत्रात २०२४ या वर्षभराच्या कालावधीत १ हजार ३०० हून अधिक वाहनांची चोरी झाली आहे. सर्वाधिक वाहने दुचाकी आहेत. तर मोटारी आणि तीन चाकी वाहनांच्या चोरीचे प्रमाणही अधिक आहे. या आकडेवारीची सरासरी केल्यास महिन्याला १०० हून अधिक वाहनांची चोरी होत असल्याचे स्पष्ट होत आहे.

ठाणे पोलिसांच्या आयुक्तालय क्षेत्रात ठाणे, कळवा, मुंब्रा, दिवा, डोंबिवली, कल्याण, उल्हासनगर, अंबरनाथ, बदलापूर आणि भिवंडी यासारखे महत्त्वाचे भाग येतात. या शहरांमध्ये काही ठिकाणी रस्त्याकडेला वाहने उभी करण्यास परवानगी आहे. तर काही ठिकाणी कामानिमित्ताने नागरिक रस्त्याकडेला वाहने उभी करतात. शहरांतील काही जुन्या इमारतींमध्ये वाहन तळाची पुरेशी सुविधा नाही. त्यामुळे गृहसंकुलातील रहिवासी देखील त्यांची वाहने रात्रीच्या वेळेत इमारती बाहेरील परिसरातील रस्त्याकडेला उभी करत असतात.

पोलीस दलाकडून मिळालेल्या आकडेवारीनुसार, ठाणे आयुक्तालय क्षेत्रात २०२४ या वर्षीच्या १ जानेवारी ते ३१ डिसेंबर या कालावधीत १ हजार ३४५ वाहने चोरीला गेली आहेत. यामध्ये सर्वाधिक दुचाकींचा सामावेश असून ९९४ दुचाकी चोरीला गेल्या आहेत. या वाहनांची किंमत आठ कोटी १२ लाख ५१ हजार ९०२ रुपये इतकी आहे. वाहन चोरी प्रकरणांमध्ये १ हजार ३५१ गुन्हे विविध पोलीस ठाण्यात दाखल आहेत. याप्रकरणांचा तपास संबंधित भागातील पोलीस ठाण्यातील अधिकारी कर्मचारी, अधिकारी करतात. तर समांतर तपास गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकांकडून सुरू असतो. पोलिसांना दाखल गुन्ह्यांपैकी ५०३ प्रकरणे उघडकीस करणे शक्य झाले असून यात ५१६ जणांना अटक झाली आहे. वाहन चोरीच्या आकडेवारीची सरासरी काढल्यास दर महिन्याला किमान १०० हून अधिक वाहनांची चोरी होत असल्याचे स्पष्ट होते.

# कल्याणमध्ये गोविंदवाडी रस्त्यावरील तबेल्यांना घेतलेल्या चोरीच्या नळ जोडण्यांवर कारवाई

■**कल्याण** : कल्याण पूर्व भागाला पाणी पुरवठा करणारी जलवाहिनी दुगार्डी किल्ला, पत्रीपूल भागातील गोविंदवाडी रस्त्यावरून जाते. या जलवाहिनीवर गोविंदवाडी भागातील म्हशींच्या तबेले मालकांनी अधिक संख्येने चोरीच्या नळ जोडण्यात घेतल्या होत्या. त्यामुळे कल्याण पूर्वेतील पाणी पुरवठ्यावर परिणाम झाला होता. या चोरीच्या नळ जोडण्यांच्या तक्रारी प्राप्त होताच पालिकेच्या पाणी पुरवठा विभागाने आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांच्या आदेशावरून गोविंदवाडी भागातील मुख्य जलवाहिनीवरील चोरीच्या ६२ बेकायदा जोडण्या तोडून टाकल्या.



"गुरुवारी शहर अभियंता अनिता परदेशी यांच्या उपस्थितीत पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता अशोक घोडे, शैलेश मळेकर, उपअभियंता महेश डावरे, राजेश गोयल, किशोर भदाणे, उदय सूर्यवंशी, कनिष्ठ अभियंता देवेंद्र एकांडे, मयूर शिंदे, दयाराम पाटील यांनी तोडकाम पथकाच्या साहाय्याने गोविंदवाडी भागातून गेलेल्या जलवाहिनीवरील तबेले मालकांनी घेतलेल्या चोरीच्या नळ जोडण्या तोडून टाकल्या. एक, दीड, दोन व्यासाच्या या जलवाहिन्या होत्या. दुगार्डी किल्ला ते पत्रीपुलाजवळील सर्वोदय सोसायटी दरम्यान मुख्य जलवाहिनीवरून तबेले मालकांनी नळ जोडण्या घेतल्या आहेत, अशी माहिती मिळाली होती. या माहितीची खात्री करून या जलवाहिनीवरील ६२ नळ जोडण्या पाणी पुरवठा विभागाने खंडित केल्या."

**-अनिता परदेशी शहर अभियंता**

कल्याण पश्चिमेत दुगार्डी किल्ला ते पत्रीपूल दरम्यानच्या गोविंदवाडी रस्त्यावर खाडी भागात अधिक प्रमाणात म्हशींचे तबेले आहेत. या तबेल्यांच्या माध्यमातून मोठा दुग्ध व्यवसाय अनेक वर्षांपासून चालतो. म्हशी चोवीस तास तबेल्यात बांधून ठेवण्यात येतात. त्यांना जागीच वैरण, पाणी दिले जाते. या सर्व व्यवस्थेसाठी तबेले चालकांना म्हशींचा गोठा स्वच्छ करणे, म्हशींना दररोज धुणे, त्यांना पाणी पाजण्यासाठी अधिक प्रमाणात पाणी लागते. तबेल्यांना अधिकृत नळ जोडण्यांमधून होणारा पाणी पुरवठा पुरेसा पडत नसल्याने अनेक तबेला मालक पालिकेच्या मुख्य जलवाहिनीला छिद्र पाडून तबेल्यांमध्ये चोरून पाणी पुरवठा घेतात. दरवर्षी पालिका या भागात चोरीच्या नळ जोडण्यांवर कारवाई करते.

उन्हाळा सुरू झाला गोविंदवाडी भागातून कल्याण पूर्व भागात पाणी पुरवठा होणाऱ्या जलवाहिनीचा पाणी पुरवठा चोरीच्या नळ जोडण्यांमुळे कमी होतो. कल्याण पूर्वच्या अनेक भागात पाणी टंचाईची परिस्थिती निर्माण होते. ही परिस्थिती गोविंदवाडी येथील तबेले चालकांच्या चोरीच्या नळजोडण्यांमुळे होत असल्याने पाणी पुरवठा विभागाला दरवर्षी या भागात कारवाई करावी लागते. गोविंदवाडी भागातील मुख्य जलवाहिन्यांवर चोरीच्या नळ जोडण्या असल्याची माहिती मिळताच आयुक्त डॉ. जाखड यांनी या जोडण्या तोडण्याचे आदेश पाणी पुरवठा विभागाला दिले.

# ठाण्यात लवकरच पॉड टॅक्सी धावणार, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक



**काय आहे पॉड टॅक्सी**

पॉड टॅक्सी उन्नत मागार्ने वाहतुक करणार आहे. त्यामुळे रस्त्यावर होणाऱ्या वाहतुक कोंडीतून नागरिकांना दिलासा मिळणार आहे.

■**ठाणे** : जमीनीवरील वाहतुक हवेतून झाल्यास शहरातील वाहतुक कोंडी कमी होणार आहे. त्यामुळे घोडबंदर भागातील भाईंदरपाडा ते विहंग हिल्स चौक पर्यंतचा मार्ग प्रायोगिक तत्त्वावर पॉड टॅक्सीसाठी देण्याचे निश्चित करण्यात आल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. यासाठी महापालिका किंवा राज्य सरकारचा एकही रुपया खर्च होणार नसल्याचेही त्यांनी सांगितले. मिरा भाईंदर येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते जेपीई हा ६० मीटर रस्ता येथेही पॉड टॅक्सी सुरू करण्याचे निश्चित केल्याचे सरनाईक यांनी सांगितले.

ठाणे शहरात वाहतुक कोडींची समस्या मोठ्याप्रमाणात आहे. घोडबंदर भागातील नागरिकांना या कोंडीचा सर्वाधिक फटका बसतो. या भागात नागरिककरण वाढले असताना रस्त्यांची रुंदी वाढलेली नाही. त्यामुळे रस्ते वाहतुकीवर मोठा भार आलेला आहे. तसेच भिवंडी आणि उरण जेएनपीटीतून सुटणाऱ्या अवजड वाहनांचा भार देखील घोडबंदर मार्गावर अधिक आहे. मागील काही वर्षांपासून ठाणे शहरात मेट्रो मार्गिकेच्या निमार्णाची कामे सुरू आहे. वडाळा-घाटकोपर- कासारवडली या मार्गिकेच्या निमार्णाचे कामे अद्यापही पूर्ण झाले नसल्याने मेट्रो प्रकल्पाच्या प्रतिक्षेत नागरिक आहेत. त्यातच आता ठाणे आणि मिरा भाईंदर भागात पॉड टॅक्सी सुरू करण्याचा निर्णय परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी घेतला आहे. सरनाईक यांनी ठाणे महापालिकेत अधिकाऱ्यांची बैठक घेतली. त्यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला सरनाईक म्हणाले की, पॉड टॅक्सी संकल्पनेला मागील वर्षी 'बीकेसी'मध्ये परवानगी देण्यात आली होती.

मेट्रो आणि अंतर्गत मेट्रोला समांतर वाहतुक व्हावी यासाठी घोडबंदर भागातील भाईंदरपाडा ते विहंग हिल्स चौका पर्यंतचा मार्ग प्रायोगिक तत्त्वावर देण्याचे निश्चित करण्यात आले आहे. यासाठी महापालिका किंवा राज्य सरकारचा एकही रुपया खर्च होणार नाही. प्रायोगिक तत्त्वावर पॉड टॅक्सीची निर्मिती होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सूचनेनंतर केंद्रीय रस्ते वाहतुक मंत्री नितीन गडकरी यांनी पॉड टॅक्सीसाठी जागा सूचविली होती. हे काम ८० टक्के पूर्ण झाले आहे. त्यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही बीकेसीमध्ये पॉड टॅक्सीसाठी परवानगी दिली होती. तशाच प्रकारची परवानगी ठाणे महापालिका आणि मिरा भाईंदर महापालिका क्षेत्रात परवानगी देण्यात येणार आहे. त्यासाठी आम्ही धोरण निश्चित केले आहे असे सरनाईक म्हणाले. जमीनीवरील वाहतुक ही हवेतून नेल्यास घोडबंदर आसपासच्या भागातील वाहतुक कोंडीवर तोडगा निघू शकेल असेही ते म्हणाले. माझ्या मतदारसंघातील ठाणे महापालिका हद्दीतील भाईंदपाडा ते विहंग हिल्स हा ४० मीटरचा रस्ता आणि मिरा भाईंदर महापालिका हद्दीतील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते जेपीई हा ६० मीटर रस्ता येथे पॉड टॅक्सी सुरू करण्याचे निश्चित केल्याचे त्यांनी सांगितले.

# ठाणे स्थानकात मद्य पिऊन धिंगाणा घालणाऱ्या महिलेसह दोघांविरोधात गुन्हा

■**ठाणे** : ठाणे रेल्वे स्थानकात मद्य पिऊन धिंगाणा घालणाऱ्या महिला आणि एका व्यक्तीविरोधात ठाणे लोहमार्ग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फलाट क्रमांक १० अ येथे दोघेही मद्य पिऊन आरडाओरड करत होते. याप्रकरणी पोलिसांनी महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम कलम आणि महाराष्ट्र पोलीस कायदा कलमांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. ठाणे रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक १० अ येथून ट्रान्स हार्बर मार्गावरील वाशी, पनवेल आणि नेरुळच्या दिशेने उपनगरीय रेल्वेगाड्यांची वाहतुक होत असते. ठाणे, मुलुंड, भांडूप, कल्याण, कर्जत, कसारा भागातील लोखो नोकरदार नवी मुंबईत कामानिमित्ताने जाण्यासाठी ठाणे स्थानकातून प्रवास करतात. त्यामुळे दररोज लाखो प्रवासी वाहतुक करत असतात. २५ फेब्रुवारीला रात्री ८ वाजताच्या सुमारास २३ वर्षीय मुलगा आणि एक ५१ वर्षीय महिला मद्य पिऊन १० अ फलाटावर मुंबई दिशेकडील पादचारी पूलाखाली उभे राहून आरडाओरड करत होते. दोघेही ठाण्यातील लोकमान्य नगर परिसरातील रहिवासी आहेत. याबाबतची माहिती लोहमार्ग पोलिसांना मिळाल्यानंतर पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी या दोघांना ताब्यात घेतले. त्यांना ठाणे जिल्हा शासकीय रुग्णालयात वैद्यकीय तपासणीसाठी नेण्यात आले. त्यावेळी त्यांच्या शरिरात मद्याचे प्रमाण असल्याचा अहवाल पोलिसांना प्राप्त झाला. त्यानुसार, त्यांच्याविरोधात आता ठाणे लोहमार्ग पोलीस ठाण्यात महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम कलम ८१ (१) आणि महाराष्ट्र पोलीस कायदा ११२ आणि ११७ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# के.ई.एम. रुग्णालयाच्या डोळ्यांखालून अवैध दत्तक प्रक्रिया
## बाळाला एच.आय.व्ही.ची लागण झाल्यावर प्रकार उघडकीस

■**ठाणे** : के. ई.एम. या मुंबईतील नामांकित रुग्णालयात खोटी कागदपत्रे दाखल करून बाळाला जन्म देऊन त्याला अवैध पद्धतीने दत्तक दिल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. कल्याण येथे राहणाऱ्या दोन महिलांचा यात सहभाग असून ठाणे जिल्हा बालसंरक्षण विभागाकडून दोन्ही महिलांविरोधात कारवाई करण्याची प्रक्रिया राबविण्यात येत आहे. मात्र या प्रकारामुळे राज्यातील नामांकित रुग्णालयाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित राहत आहे.

मुंबईतील के.ई.एम. रुग्णालयात संपूर्ण राज्यभरातून रुग्ण उपचारासाठी येत असतात. यामुळे हे रुग्णालय चोवीस तास वर्दळीने गजबजलेले असते. याचाच फायदा घेत कल्याण येथे राहणाऱ्या एका महिलेने रुग्णालय प्रशासनाची दिशाभूल केली असल्याचे प्रकरण उघडकीस आले आहे. कल्याण येथील आडिवली - ढोकाळी परिसरात राहणाऱ्या एका शिल्पा नामक गरोदर महिलेने आपला पती नियमित दारू पित असून मी बाळाला सांभाळू शकत नसल्याचे सांगून बाळाला कोण सांभाळेल याचा शोध सुरु केला. यावेळी महिलेच्या परिचयातील शेहनाज या महिलेने बाळाला स्वीकारण्यासाठी तयार असल्याचे सांगितले. मात्र कोणतीही कायदेशीर प्रक्रिया न करता बाळाची दत्तक प्रक्रिया या दोन्ही महिलांनी संगनमताने राबविली.



**रुग्णालयाचा निष्काळजीपणा?**

या प्रकरणामध्ये महिलेने प्रसूतीसाठी दाखल होते वेळी दुसऱ्याच महिलेचे कागदपत्र सादर केले. याउपर बाळाच्या जन्म दाखल्यावरही जन्मदात्या आई ऐवजी दुसऱ्याचे अर्थात शेहनाजचे नाव ही टाकून घेतले. मात्र या सर्व प्रकरणात रुग्णालय प्रशासनाला या खोट्या कागदपत्रांबाबत कुठेही गैरप्रकार होत असल्याबाबत समजले नाही. रुग्णालय प्रशासनाच्या या निष्काळजीपणाच्या बाबत आता प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहेत.

**प्रकरण नेमके काय?**

कल्याण येथे राहणारी शिल्पा नामक महिला ऑक्टोबर २०२४ या महिन्यात के. ई.एम. रुग्णालयात प्रसूती साठी दाखल झाली. यावेळी तिने माझे नाव शेहनाज असल्याचे सांगून रुग्णालयात शेहनाज या महिलेचे आधार कार्ड आणि इतर कागदपत्र सादर केले. तसेच बाळाला जन्म दिल्यानंतर बाळाच्या जन्मदाखल्यावरही आई म्हणून शेहनाजचा उल्लेख केला. यानंतर शेहनजाला बाळ सोपवून शिल्पा तेथून निघून गेली. मात्र मागील काही दिवसांपासून बाळाची तब्येत बिघडल्याने त्याला शेहनाज या महिलेने परळ येथील वाडिया रुग्णालयात दाखल केले. यावेळी बाळावर अपेंडिक्सची शस्त्रक्रिया पार पडली आणि या दरम्यान बाळाला एचआयव्ही विषाणूची लागण झाल्याचे समोर आले. यानंतर आईची ही तपासणीची वेळ आली असता, शेहनाजने मी बाळाची खरी आई नसल्याची कबुली दिली. यानंतर वाडिया रुग्णालय प्रशासनाने मुंबईतील सखी केंद्राला माहिती दिली. यानंतर सर्व प्रकरण समोर आले. याबाबत ठाणे जिल्हा बालसंरक्षण विभागाकडून मानपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असल्याची माहिती जिल्हा बालसंरक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांकडून देण्यात आली आहे.

# प्रियकराच्या त्रासाला कंटाळून तरुणीची आत्महत्या

■**कल्याण** : प्रियकर आणि त्याच्या कुटुंबीयांकडून होणाऱ्या असह्य त्रासाला कंटाळून टिटवाळा येथे तरूणीने राहत्या घरात आत्महत्या केली आहे. या तरूणीने आत्महत्येपूर्वी समाज माध्यमांवर दृध्यध्वनी चित्रफितीनेव्दारे प्रियकर आणि त्यांच्या कुटुंबीयांकडून आपणास कसा त्रास दिला जात होता याची माहिती प्रसारित केली आहे.जोपर्यंत प्रियकर आणि त्याच्या कुटुंबीयांना अटक होत नाही, तोपर्यंत मृत तरूणीचा मृतदेह ताब्यात घेणार नाही, अशी भूमिका मृत तरूणीच्या कुटुंबीयांनी घेतली आहे.

सुमन मच्छिंद्र शेंडगे (३२) असे मृत तरूणीचे नाव आहे.



पोलिसांनी दिलेली माहिती अशी, की मृत तरूणी सुमन आणि सचिन शास्त्री यांचे मागील दहा वषार्पासून प्रेमप्रकरण सुरू होते. आपण लग्न करून, संसार करू, अशी आश्वासने प्रियकर सचिन शास्त्री प्रेयसी सुमन यांना देत होता. आपण लग्न करणार आहोत, असे सांगून त्याने तिच्या बरोबर शारीरिक संबंध ठेवले होते. बरोबरचे प्रकरण सुरू असताना सचिन यांनी सुमनला काही कळू न देता एका तरूणीशी परस्पर लग्न केले. ही माहिती सचिन बरोबर लग्न केलेल्या तरूणीला समजली.

याप्रकरणानंतर सचिन आणि त्यांच्या कुटुंबीयांना सुमन शेंडगेला विविध प्रकारे त्रास देण्यास सुरूवात केली. प्रियकर आणि त्यांच्या कुटुंबीयांकडून होणाऱ्या त्रासाला सुमन आणि तिचे कुटुंबीय कंटाळले होते. मानसिक त्रास वाढल्याने अखेर सुमनने आपल्या राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. टिटवाळा पोलीस ठाण्यात सुमनच्या कुटुंबीयांनी तक्रार केली आहे. पोलिसांनी यप्रकरणी गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. आरोपींवर कठोर कारवाई करण्याचे आश्वासन सुमनच्या कुटुंबीयांना दिले आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई 400063 (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com